पुणे आवृत्ती

बातम्यांचा राजा

# जनप्रवास

मुंबई, पुणे, अ.नगर येथून एकाच वेळी प्रसिद्ध.

RNI NO. MAHMAR/2013/57952

गुरुवार, दि. ०९ एप्रिल २०२६ | वर्ष : १३ | अंक : ३४६ | पाने ८ | किंमत २ रुपये

www.janpravaslive.in E-mail : dainikjanpravas@gmail.com

आतील पानात...

३ नाशिकमधील कंपनीचे उदाहरण देत 'कॉर्पोरेट जिहाद'चा उल्लेख

४ भविष्य सांगण्याच्या बहाण्याने वृद्धांची फसवणूक; दोघे अटकेत

५ मेलेल्या बकऱ्याचे मटण विक्रीचा धक्कादायक प्रकार



पान ८ वर..

# बारामती पोटनिवडणुकीतून सहाजणांचे अर्ज बाद: राहुरीतून चौघांचे अर्ज मागे; सुनेत्रा पवारांच्या विरोधात काँग्रेस ठाम

जनप्रवास । प्रतिनिधी

बारामती : बारामती विधानसभा पोटनिवडणुकीची उत्सुकता शिगेला पोहचली आहे. उमेदवारी अर्जाची छाननी करीत असताना दाखल करण्यात आलेल्या ५९ उमेदवारी अर्जापैकी ५३ जणांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत, तर सहाजणांचे अर्ज बाद झाले आहेत. गुरुवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे शेवटच्या दिवशी किती जण निवडणूक रिंगणातून माघार घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीकडून प्रयत्न सुरु आहेत.

**आज अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिवस**

अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर बारामती विधानसभेची पोटनिवडणूक होत आहे. त्यामुळे सर्वांचे त्याकडे लक्ष लागले आहे. निवडणूक लागल्यापासूनच ही निवडणूक बिनविरोध करण्याच्या हालचाली सुरु होत्या. मात्र या पोटनिवडणुकीसाठी ५९ जणांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्यामुळे निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता मावळली आहे. बुधवारी दुपारी उमेदवारी अर्जाची छाननी करीत असताना ५९ अर्जापैकी ५३ जणांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत, तर सहा जणांचे अर्ज छाननीवेळी बाद झाले.उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा गुरुवारी शेवटचा दिवस आहे. त्यामुळे शेवटच्या दिवशी किती जण निवडणूक रिंगणातून माघार घेणार याची उत्सुकता लागली आहे. ही निवडणूक बिनविरोध व्हावी यासाठी महायुतीकडून प्रयत्न केले जात आहेत. मात्र, निवडणूक रिंगणात काँग्रेसच्या उमेदवाराने एंट्री केल्याने निवडणूक बिनविरोध करण्याची शक्यता मावळली आहे.



दुसरीकडे महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेने उमेदवार न देता निवडणुकीपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला आहे. तर अचानक काँग्रेसने उमेदवार दिला आहे. त्यामुळे सर्वांचे लक्ष गुरुवारी निवडणूक रिंगणातून कोण-कोण माघार घेणार याकडे लागले आहे. काँग्रेस पक्षाने आकाश मोरे यांच्या रुपाने धनगर उमेदवार रिंगणात उतरवून जातीय कार्ड खेळले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्यासाठी ही लढाई अपेक्षेइतकी सोपी राहिलेली नाही. दरम्यान, या पार्श्वभूमीवर बुधवारी सुनेत्रा पवार व खासदार पार्थ पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत देवेंद्र फडणवीस यांनी सुनेत्रा पवार यांना एक महत्त्वाचा शब्द दिला. बारामतीच्या पोटनिवडणुकीत भाजप मोठा भाऊ म्हणून तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील. सुनेत्रा पवारांना निवडून आणण्यासाठी भाजप आवश्यक ती सर्व मदत करेल, असे फडणवीस यांनी या भेटीत सांगितले.

या निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांच्या विरोधात काँग्रेसने आकाश मोरे यांना अधिकृत उमेदवारी देऊन रिंगणात उतरवले असून, काँग्रेसने आतापासूनच निवडणुकीच्या प्रचाराची जोरदार तयारी सुरू केली आहे. दुसरीकडे, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघातही काही उमेदवारांनी माघार घेतल्याने आता १८ उमेदवार निवडणूक रिंगणात शिल्लक राहिले आहेत. बारामतीत काँग्रेसने माघार न घेण्याचा पवित्रा घेतल्याने येथील लढत तिरंगी किंवा चुरशीची होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, अहिल्यानगरमधील राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या उमेदवारी अर्ज माघारी घेण्याच्या दुसऱ्या दिवशी चार उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले असून, आता १८ उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले आहेत. उद्या गुरुवारी अर्ज माघारी घेण्याचा शेवटचा दिवस असल्याने मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची शक्यता असून, महायुतीतील शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी दाखल केलेले दोन अपक्ष अर्ज आणि शिवसेना ठाकरे सेनेचे जिल्हा संघटक रावसाहेब खेवरे यांच्या उमेदवारीबाबत नेमका काय निर्णय होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात प्रामुख्याने भाजप-महायुतीचे अक्षय कर्डिले आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे गोविंदराव मोकाटे यांच्यातच थेट लढत होणार असल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

## संक्षिप्त

### रस्ते काँक्रिटीकरणाच्या कामांना मुदतवाढ नाही

जनप्रवास । प्रतिनिधी

मुंबई : रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाचा पहिला टप्पा १२ डिसेंबर २०२६, तर दुसरा टप्पा मे २०२७ पर्यंत पूर्ण करावा. या कामासाठी कोणत्याही स्वरूपाची मुदतवाढ दिली जाणार नाही. नागरिकांची गैरसोय होऊ नये, यासाठी सध्या सुरू असलेल्या रस्त्यांची कामे ३१ मे पर्यंत पूर्ण होतील, याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी आढावा बैठकीत प्रशासनाला दिले.

पालिकेचे अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर, उपायुक्त (पायाभूत सुविधा) गिरीश निकम, उपायुक्त (आयुक्त कार्यालय) प्रशांत गायकवाड, प्रमुख अभियंता (रस्ते), मंतय्या स्वामी यांच्यासह अभियंते या बैठकीला उपस्थित होते. काँक्रीटीकरणाच्या गुणवत्तेवर भिडे यांनी विशेष भर दिला. काँक्रीटीकरण पूर्ण झालेले, प्रगतिपथावर असलेल्या आणि लवकरच काँक्रीटीकरण सुरू होणाऱ्या रस्त्यांची माहिती 'डॅश बोर्ड'वर स्वतंत्र रकान्यात देण्यात आली आहे.

रस्तेकामे पूर्ण करताना पालिकेचा जलअभियंता, पर्जन्य जलवाहिन्या, पाणीपुरवठा प्रकल्प, मलनिस्सारण प्रचालन, मलनि:स्सारण प्रकल्प आदी विविध विभाग आणि उपयोगिता सेवा वाहिन्यांशी संबंधित यंत्रणा यांच्यासमवेत समन्वय ठेवण्यात आला आहे.

### भोंदू खरातला बलात्काराच्या तिसऱ्या गुन्ह्यात अटक होण्याची शक्यता

जनप्रवास । प्रतिनिधी

नाशिक : भोंदू तांत्रिक कॅप्टन अशोक खरात यांच्या मागे खटल्यांचा ससेमीरा लागला आहे. त्यामुळे आता त्याचे कारागृहातून बाहेर पडणे अवघड होण्याची चिन्हे आहेत. आता आणखी काही दिवस त्याचा मुक्काम पोलीस कोठडीत असेल. भोंदू तांत्रिक कॅप्टन खरात याची पोलीस कोठडीची मुदत संपुष्टात आली. सुरक्षिततेचा उपाय म्हणून त्याला ऑनलाईन न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी पोलिसांनी त्याला २४ एप्रिल पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली.

न्यायालयीन कोठडी सुनावली असली तरी त्याच्या जामीन्याचा मार्ग मात्र खडतर आहे. विशेष तपास पथकाने (एसआयटी) खरात याच्या विरोधात दाखल तिसऱ्या बलात्काराच्या खटल्यात अटकेची परवानगी मागितली. न्यायालयाने तो अर्ज मंजूर केला. या प्रकरणातील सरकारी वकील शैलेंद्र बागडे यांनी खरात याच्या अटकेसाठी न्यायालयाची परवानगी मागितली होती. त्यांचा हा अर्ज न्यायालयाने मंजूर केला.

## दुसऱ्या लग्नासाठी अडथळा ठरल्याने ११ महिन्याच्या मुलाचा खून; आई अटकेत

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : शिरूर तालुक्यातील भांबर्डे येथे आईनेच आपल्या ११ महिन्यांच्या मुलाचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. दुसरा विवाह करण्याच्या विचारात मुलगा अडथळा ठरत असल्याने आरोपी महिलेने बालकाला कपडे धुण्याच्या दगडावर आपटून ठार मारल्याची कबुली दिली आहे.

या प्रकरणात पूजा रवींद्र पवार (२२) हिला रांजणगाव एमआयडीसी पोलिसांनी अटक केली असून मृत बालकाचे नाव यश रवींद्र पवार असे आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ मार्च रोजी पूजा ही मुलगा यशला घेऊन घरातून निघून गेली होती. पत्नी आणि मुलगा बेपत्ता झाल्यानंतर पतीने रांजणगाव एमआयडीसी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तपासादरम्यान ५ एप्रिल रोजी पूजा जांबूत



परिसरात असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तिला ताब्यात घेतले.

सुरुवातीला मुलगा ओट्यावरून पडून मृत्यू झाल्याचे सांगत तिने मृतदेह पोत्यात भरून विहिरीत टाकल्याचा दावा केला. मात्र शवविच्छेदन अहवाल आणि तपासातील विसंगतीमुळे पोलिसांचा संशय बळावला. पुन्हा चौकशीत तिने दुसऱ्या विवाहासाठी मुलगा अडथळा ठरत असल्याने त्याचा खून केल्याची कबुली दिली.यानंतर पोलिसांनी तिच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## नो ड्रग्स व्हॉलेंटिअर मोहिमेला वेग; युवकांनी पुढे यावे : पोलिस आयुक्त अमितेश कुमार

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पोलिसांनी शहरातील अमली पदार्थांच्या वाढत्या सेवनाला आळा घालण्यासाठी 'नो ड्रग्स व्हॉलेंटिअर' मोहिमेला गती दिली आहे. या मोहिमेत युवकांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी केले. लष्कर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आझम कॅम्पस येथील असेंब्ली हॉलमध्ये आयोजित जनजागृती कार्यक्रमात ते बोलत होते.

'नशामुक्त तरुणाई पुणे पोलिस स्वयंसेवक' मोहिमेअंतर्गत हा कार्यक्रम पुणे पोलिस, लष्कर पोलिस ठाणे, डॉ. पी. ए. इनामदार युनिव्हर्सिटी, अवामी महज आणि पद्मपाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार



पडला. या कार्यक्रमात सुमारे २०० ते २५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी सहपोलिस आयुक्त रंजनकुमार शर्मा, गुन्हे शाखेचे उपायुक्त निखिल पिंगळे, विशेष शाखेचे उपायुक्त डॉ. संदीप भाजीभाकर, परिमंडळ ५ चे उपायुक्त, सहायक पोलिस आयुक्त राजलक्ष्मी शिवणकर, तसेच लष्कर विभागाच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक संगीता अल्फान्सो, संतोष खेतमाळस उपस्थित होते. एम.सी.ई. सोसायटीच्या अध्यक्षा अबेदा इनामदार, ट्रस्टी आय.पी. इनामदार, पद्मपाणी फाउंडेशनचे अध्यक्ष राहुल डंबाळे आणि डॉ. पी.ए. इनामदार विद्यापीठाचे पदाधिकारी व शिक्षकही उपस्थित होते.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी अमली पदार्थांचे वाढते सेवन ही पुणे शहरातील गंभीर समस्या असल्याचे नमूद केले. पोलिसांनी यापूर्वी अनेक कारवाया केल्या असल्या तरी जनजागृती अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी युवकांना व्यसनाचे दुष्परिणाम आणि त्यातून होणारे कौटुंबिक नुकसान याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

'नो ड्रग्स व्हॉलेंटिअर' मोहिमेद्वारे शहरातील एक लाख विद्यार्थ्यांना जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. ही मोहीम शाळा व महाविद्यालयांमध्येही राबविण्यात येणार असून, युवकांनी स्वयंसेवक म्हणून पुढे यावे, असे आवाहन करण्यात आले. कार्यक्रमात ड्रग्स शोध पथकाचे प्रात्यक्षिकही सादर करण्यात आले.

## बस प्रवासात उलटीचा बहाणा करुन दागिने चोरणारी महिला गजाआड

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पीएमपी बसमध्ये प्रवासादरम्यान उलटीचा बहाणा करून महिला प्रवाशाचे लक्ष विचलित करत सात लाख रुपयांचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या महिलेला वानवडी पोलिसांनी अटक केली. ननिता दिनेश कांबळे (वय ३७) असे अटक करण्यात आलेल्या महिलेचे नाव आहे.

३० मार्च रोजी हडपसर गाडीतळ ते चिंचवड मार्गावरील बसमध्ये ही घटना घडली. आरोपीने उलटी येत असल्याचे नाटक करून तक्रारदार महिलेचे लक्ष दुसरीकडे वळवले आणि तिच्या पिशवीतील दागिने लंपास केले.

तक्रारीनंतर पोलिसांनी तपास सुरू करून हडपसरमधील शिंदे वस्ती परिसरातून आरोपी महिलेला सापळा रचून पकडले. तिच्याकडून ६ लाख ९० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले असून, चौकशीत तिने चोरीची कबुली दिली. वानवडी पोलिसांनी पुढील तपास सुरू ठेवला आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर, सहायक आयुक्त नम्रता देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक भाऊसाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केली.


## उजनी धरण पाणी पातळी ३८ टक्क्यांवर

### गतवर्षीच्या तुलनेत २० टक्के पाणी साठा जास्त

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुणे, सोलापूर,अहिल्यानगर जिल्ह्यांसाठी वरदान ठरलेल्या उजनी धरण (यशवंत सागर जलाशय) यंदाची पाणी पातळी समाधानकारक असून बुधवारी (दि,८) रोजी पाणी पातळी ३८ टक्के झाली असून गतवर्षीच्या तुलनेत २० टक्क्यांनी यंदा पाणी साठा जास्त असल्याने शेतकरी, वर्गासह उजनी धरणावर अवलंबून असणाऱ्या व्यावसायिकांमध्ये समाधानाचे वातावरण पहायला मिळत आहे.

यंदा सर्वत्र मोठ्या प्रमाणात झालेला पाऊस आणि धरण पाणलोट क्षेत्रात सतत पाऊस झाल्याने उजनी धरण लवकरच पूर्ण क्षमतेने भरलेले होते. याचा फायदा धरणावर अवलंबून असणाऱ्या शेतकरी, मासेमार, औद्योगिक कारखाने, शहरांच्या पाणी पुरवठा योजनांना होत आहे. बाष्पीभवनामुळे पाण्याच्या पाणी पातळीत लक्षणीय घट होत आहे. रब्बी हंगामात १५ ऑक्टोबर ते २८ फेब्रुवारी दरम्यान ४.६७ टीएमसी पाणी बाष्पीभवन झाले. तसेच १



मार्च ते ६ एप्रिल या उन्हाळी कालावधीत १.६० टीएमसी पाणी कमी झाले आहे.

उजनी जलाशयाच्या पाण्यावर दौंड, इंदापूर, कर्जत, करमाळा तालुक्यातील पाणी पुरवठा योजना अवलंबून आहेत. नदीकाठच्या गावांमधील शेती पूर्णतः उजनीच्या पाण्यावर अवलंबून आहे. पाणी पातळी खाली गेल्यावर विद्युत पंप पाण्यासोबत खाली नेण्याची धडपड शेतकऱ्यांना करावी लागते. यामुळे पाण्याचे नियोजन व्यवस्थित न झाल्यास यापुढील काळात धरणावर अवलंबून असणाऱ्या शेतकरी, मासेमार यांचे नियोजन कोलमडले जाते. पुढील शिल्लक पाण्याचे योग्य नियोजन कालवा सल्लागार समितीला करावे लागणार आहे.

## भरधाव पाण्याच्या टँकरची दुचाकीला धडक; २४ वर्षीय तरुणीचा मृत्यू

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे : पुण्यातील वानवडी परिसरात भरधाव पाण्याच्या टँकरने दुचाकीला धडक दिल्याने २४ वर्षीय तरुणीचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. गंगा सॅटेलाइट परिसरातील नाल्यावरील पुलाजवळ हा अपघात झाला.

मृत तरुणीचे नाव ग्रासीया डोरा (२४) असे असून ती वानवडीतील नॅन्सी टॉवरमध्ये कुटुंबीयांसोबत राहत होती. अपघातावेळी ती दुचाकीवरून जात असताना टँकरच्या डाव्या पुढील चाकाखाली आल्याने तिचा जागीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच वानवडी बाजार पोलिसांनी




घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला. या अपघातामुळे काही काळ परिसरात वाहतूक कोंडी झाली होती.

या प्रकरणी पोलिसांनी टँकर चालक संतोष मोर्या (४५) याला अटक केली आहे. अपघातानंतर चालक स्वत:हून वानवडी बाजार पोलिस चौकीत हजर झाला. पोलिस उपनिरीक्षक सारिका शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## 'मिसिंग लिंक'च्या कामाला गती; बालेवाडी-वाकड पूल रस्ता भूसंपादनाची अधिसूचना जारी

### ना. चंद्रकांतदादा पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

जनप्रवास । प्रतिनिधी

पुणे: कोथरुड मतदारसंघातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केलेल्या पाठपुराव्याला मोठे यश आले आहे. बाणेरमधील कस्पटे वस्ती परिसरातील 'मिसिंग लिंक'च्या कामाला गती देण्यासाठी, बालेवाडी-वाकड पूल रस्ता जमीन अधिग्रहणाची अधिसूचना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अखेर जारी करण्यात आली आहे.

कोथरुड विधानसभा मतदारसंघातील सर्व प्रकारची वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि विधानसभा मतदारसंघाचे आमदार चंद्रकांतदादा पाटील सातत्याने आग्रही आहेत. त्यांच्या प्रयत्नांमुळेच बुधवारी ही अधिसूचना जारी करण्यात आली असून, आता कस्पटे वस्ती येथील रस्त्याच्या कामाला प्रत्यक्ष गती मिळणार आहे. या अधिसूचनेनुसार, बाणेर-वाकड पुलासाठी बाणेर भागातील विकास योजनेतील ३० मीटर रुंदीच्या रस्त्यासाठी जमीन अधिग्रहण करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे.

हे संपादन महाराष्ट्र महापालिका



अधिनियम कलम २०५ अन्वये आरक्षित केलेल्या जागेसाठी होणार आहे. तसेच, विकास आराखड्यानुसार हा रस्ता ३० मीटर रुंद असणार आहे, ज्यामुळे भविष्यातील वाढती वाहतूक विचारात घेऊन तिथे सुसज्ज पदपथ आणि सायकल ट्रॅकचेही नियोजन करण्यात आले आहे.

बाणेर ते वाकड परिसरातील वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी बालेवाडी-वाकड उड्डाणपूल अत्यंत महत्त्वाचा आहे. हा मार्ग लवकरात लवकर खुला व्हावा यासाठी आमचे प्रयत्न सुरू होते. आता अधिसूचना निघाल्याने कामाला वेग आला असून, या मार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर परिसरातील नागरिकांची वाहतूक कोंडीतून कायमस्वरूपी मुक्तता होईल, असा विश्वास ना. चंद्रकांतदादा पाटील यांनी व्यक्त केला.

या रस्त्यामुळे हिंजवडी आयटी पार्कमध्ये जाणाऱ्या हजारो कर्मचाऱ्यांसाठी हा 'शॉर्टकट' ठरणार आहे. यामुळे मुंबई-बेंगळुरू महामार्गावरील राधा चौक आणि भुजबळ चौक येथील वाहतूक कोंडीचा भार ५० टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.

# अग्रलेख : भाजपचा एक देश, एक निवडणूक अजेंडा

'एक देश, एक निवडणूक' हा भाजपचा पुढचा अजेंडा राहणार आहे. देशात सध्या समान नागरी कायदा (यूसीसी) आणि 'एक देश, एक निवडणूक' यावर सकारात्मक चर्चा सुरू असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय जनता पक्षाच्या स्थापना दिनानिमित्त कार्यकर्त्यांना आभासी पध्दतीने संबोधित करताना स्पष्ट केले. यूसीसी व 'एक देश, एक निवडणूक' हे विषय भाजपच्या अजेंड्यावरील महत्त्वाचे 'अधुरे कार्य' असल्याचे मोदी म्हणाले. भाजपच्या स्थापना दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पंतप्रधानांनी काँग्रेसवर जोरदार निशाणा साधला. मोदी म्हणाले, भाजप कार्यकर्त्यांनी आणीबाणीसारख्या काळाचा सामना केला असून काँग्रेसच्या राजवटीत अनेक संकटे झेलली आहेत. पश्चिम बंगाल व केरळ या राज्यांचा उल्लेख करत मोदी म्हणाले, या राज्यात हिंसाचाराला राजकीय संस्कृतीचे स्वरूप दिले गेले आहे. तेथे अनेक भाजप कार्यकर्त्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान दिले आहे.

'एक देश, एक निवडणूक' (लोकसभा व विधानसभा निवडणुका एकाच वेळी घेणे) आणि 'समान नागरी कायदा' (विवाह, दत्तक विधान इत्यादीसाठी सर्वांना समान कायदा) यावर देश सकारात्मक दिशेने पुढे जात आहे. ब्रिटिश काळातील कालबा कायदे रद्द करणे, नवीन संसद भवनाची उभारणी, सवर्णामधील गरिबांना १० टक्के आरक्षण, तिहेरी तलाक बंदी, सीएए आणि अयोध्या राम मंदिर निर्मिती ही भाजपच्या प्रामाणिक प्रयत्नांची फळे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मोदी म्हणाले, कायद्याद्वारे 'ट्रिपल तलाक'वर बंदी, नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए) लागू करणे व अयोध्येत राम मंदिराची उभारणी ही भाजपच्या प्रयत्नांची काही उदाहरणे आहेत.

कारण समान नागरी संहिता व 'एक देश, एक निवडणूक' सारख्या महत्त्वाच्या मुद्यांवर सध्या देशभरात गांभीर्याने चर्चा सुरू आहे. आरएसएसच्या वटवृक्षाच्या छायेखाली आम्हाला शुद्ध हेतूने व सचोटीने राजकारणात प्रवेश करण्याची प्रेरणा मिळाली असे सांगताना मोदी म्हणाले, सुरुवातीच्या काही दशकांमध्ये आम्ही आमची ऊर्जा संघटनेसाठी धोरणे आखण्यात समर्पित केली. त्यानंतर असा काळ आला जेव्हा भाजपने स्वत:ला एक मजबूत आणि कार्यकर्त्यांवर आधारित पक्ष म्हणून उभारण्यात स्वत:ला पूर्णपणे झोकून दिले. भाजपचे खायचे अन् दाखवायचे दात वेगळे आहेत यात शंका नाही. भाजपच्या रणनीतीचे ताजे उदाहरण म्हणजे, पश्चिम बंगालमध्ये फायद्यासाठी भाजपकडून महिला आरक्षणाची खेळी करण्यात आली आहे. पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीच्या केवळ आठवडा आधी संसदेच्या तीन दिवसांच्या अधिवेशनात महिला आरक्षण कायद्यात दुरुस्ती करण्याचा घाट घालून केंद्र सरकारने महिला मतदारांना भाजपकडे आकर्षित करण्याची खेळी केली. आचारसंहिता लागू असताना घाईघाईने घटनादुरुस्तीला काँग्रेस व तृणमूल काँग्रेस या दोन्ही पक्षांनी विरोध केल्याने राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे.

संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित न होता तहकूब करण्यात आले असून १६ ते १८ एप्रिल दरम्यान 'नारी शक्ती वंदन अधिनियम' या कायद्यामध्ये घटनादुरुस्ती केली जाणार आहे. या घटनादुरुस्तीद्वारे २०२९ च्या लोकसभा निवडणुकीमध्येच महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवल्या जातील. त्यासाठी मतदारसंघाची फेररचना करावी लागणार आहे. पण, २०२७ च्या जनगणनेची वाट न पाहताच २०११ च्या जनगणनेनुसार ही फेररचना लागू केली जाईल. घटनादुरुस्तीसारखा अत्यंत महत्त्वाचा निर्णय एकतर्फी, विरोधकांशी चर्चा न करताच घेण्यास काँग्रेस व तृणमूल काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. तसे पत्र काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी पंतप्रधानांना लिहिले होते. शिवाय, सर्वपक्षीय बैठक घेऊन निर्णय घेण्याचेही आवाहन केले होते. मात्र, या पत्राला तसेच सर्वपक्षीय बैठकीच्या मागणीला केंद्र सरकारने प्रतिसाद दिला नाही. 'नारी शक्ती वंदन अधिनियम' कायद्यातील दुरुस्तीच्या वेळेवर तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी शंका उपस्थित केली. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेस व भाजप यांच्यात लढाई तीव्र झाली असून दोन्ही पक्षांसाठी महिला मतदार निर्णायक असल्याने त्यांना आकर्षित करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

भाजपने मध्य प्रदेश, महाराष्ट्र, बिहार या राज्यानंतर पश्चिम बंगाल निवडणुकीतही महिला मतदार केंद्रित प्रचाराच्या रणनीतीवर भर दिला आहे. याआधी झालेल्या राज्यांतील विधानसभा निवडणुकीत लाडली बहेना, लाडकी बहीण अशा नावाखाली महिलांच्या हाती रोख रक्कम देणा-या रेवड्यांचा लाभ निवडणुकांमध्ये भाजपला झाला होता. आता पश्चिम बंगालमध्ये महिला आरक्षणाच्या कायद्यात बदल करून निवडणूक काळात नवी रेवडी वाटण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा प्रमुख आधार महिला मतदारांवरील प्रभाव कमी करण्याचा भाजपचा प्रयत्न आहे. विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू असताना केंद्र सरकार महिला आरक्षण कायद्यात बदल करण्याचा महत्त्वाचा निर्णय कसा घेऊ शकते, असा सवाल काँग्रेसचे राष्ट्रीय महासचिव जयराम रमेश यांनी उपस्थित केला आहे. सन २०२३ मध्ये महिला आरक्षण विधेयक संमत झाले तेव्हाच खरगेंनी या कायद्याची अंमलबजावणी करण्याची मागणी केली होती. तामिळनाडू व पश्चिम बंगालच्या निवडणुकांवर प्रभाव टाकणे हा भाजपचा एक कलमी कार्यक्रम आहे. काँग्रेसविरोधात कायम तुणतुणे वाजवणा-या भाजपची 'हम करे सो कायदा' हीच रणनीती आहे.

# आता गोंदियातही अजितदादा पोस्टरवरून गायब

## राजधानीतून



## राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल यांच्या मेळाव्यात प्रकार



एकीकडे अजितदादांच्या पश्चात दोन्ही राष्ट्रवादी एकत्रिकरणाचा वाद सुरू आहे. त्यात दुसरीकडे सुनेत्राताई पवार यांनी राज्य निवडणूक आयोगाला दिलेल्या पक्षाच्या पत्रकात कार्याध्यक्ष खा. प्रफुल्ल पटेल व खा. प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांना साईडकॉर्नर केल्याच्या चर्चा आहेत. या दोघांकडून पक्षावर कब्जा घेण्याच्या स्पर्धेची चर्चा असतानाचा आता रायगडनंतर पुन्हा गोंदियातही बॅनरवरून अजितदादांचा फोटो गायब केल्याचा प्रकार चव्हाट्यावर आला आहे. याबाबत प्रफुल पटेलांनी आता याकडे दुर्लक्ष करा असे केलेले विधान त्याहून गंभीर आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) दिवंगत राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या अचानक विमान अपघातात निधनाने पक्षात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. वास्तविक अजितदादांच्या हयातीतच दोन्ही राष्ट्रवादीच्या विलिनीकरणाचा विषय ऐरणीवर आला होता. त्यासंदर्भात मुहूर्तही काढण्यात आला तरी तो त्यांच्या निधनाने मागे पडला. अर्थात अजयतदादांच्या निधनाला काही काळ उलटत नाही तोच, पक्षाच्या अंतर्गत राजकारणात मोठी उलथापालथ सुरू झाली असल्याची चर्चा सुरू आहे. यासाठीच विलनीकरणाचा धोका लक्षात घेऊन प्रफुल्ल पटेल व तटकरे यांनी अजितदादांच्या जागी उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्राताई पवार यांचा शपथविधी घडवून आणला. तसेच अवघ्या आठ-दहा दिवसांत त्यांनाच राष्ट्रीय अध्यक्ष बनवून एकप्रकारे दोन्ही राष्ट्रवादी एकत्रिकरण, विलनीकरणाचा डाव उधळून लावला. अर्थात हे करताना त्यांनी पक्षावर आपला वरचष्मा ठेवल्याने दोन्ही राष्ट्रवादीत नाराजीचा सूर येऊ लागला.

दरम्यान, पटेल, तटकरे यांनी भाजपसोबत संगनमताने पक्षावर कमांड ठेवत सुनेत्राताई व पार्थ, जय पवारांनाही हाताळण्यास सुरुवात केली. पण सुनेत्राताईंनी याकडे सुरुवातीला दुर्लक्ष केले होते. अशातच रायगडमध्ये सुनील तटकरे यांच्या मतदारसंघात अजित पवारांचा फोटो बॅनरवरून हटवल्याचा प्रकार चव्हाट्यावर आला आणि त्याबद्दल नाराजीचा सूरही दिसून आला. याची दखल घेत सुनेत्राताईंनी निवडणूक आयोगाला पत्र देताना या दोघांचेही पंख कापल्याचे दिसून आले. त्यांचे नामोल्लेख पत्रात असले तरी पदांना मात्र कात्री लागली होती. याबाबत जोरदार चर्चाही सुरू झाल्या. त्यातच आता सुनेत्राताईंच्या बारामतीतील पोटनिवडणुकीच्या हालचाली सुरू आहेत. तेथेही या दोघांनीच पदाधिकारी म्हणून आपला होरा कायम ठेवत पक्षाचे आपणच सर्वेसर्वा असल्याचे दाखविण्यास सुरुवात केली आहे. त्याबद्दल बारामतीकरांतूनही नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान आता पुन्हा अजितदादांचे छायाचित्र गायब करण्याचा प्रकार ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांचा प्रभाव असलेल्या गोंदिया जिल्ह्यातही घडला आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा शहरात नुकताच राष्ट्रवादी काँग्रेसचा कार्यकर्ता मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. आगामी राजकीय घडामोडींच्या दृष्टीने हा मेळावा महत्त्वाचा मानला जात होता. मात्र, या मेळाव्यासाठी शहरात लावण्यात आलेल्या अधिकृत बॅनरवर एक विचित्र गोष्ट सर्वांच्या निदर्शनास आली. या बॅनरवर ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल आणि स्थानिक नेत्यांचे फोटो डोकवत असताना, पक्षाचा मुख्य चेहरा राहिलेल्या दिवंगत अजित पवार यांचा फोटो मात्र पूर्णपणे गायब होता. राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचा स्थानिक नेत्यांसोबत लहान फोटो बॅनरवर दिसला. रायगडमध्ये प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि मंत्री अदिती तटकरे यांच्या बॅनरवरून अजित पवारांचा फोटो हटवल्यामुळे आधीच टीका झाली होती. आता तोच 'रायगड पॅटर्न' प्रफुल्ल पटेलांच्या जिल्ह्यातही पाहायला मिळाल्याने खळबळ उडाली आहे.

### प्रफुल्ल पटेलांचा उत्तरास नकार; कृतघ्नपणाचा आरोप

गोंदियात राष्ट्रवादी कार्यकर्ता मेळाव्यात खा. प्रफुल्ल पटेल यांचा मोठा फोटो आहे. त्यात अध्यक्ष या नात्याने सुनेत्राताईंचा फोटो मोठा न वापरता स्थानिक कार्यकर्त्यांसमवेत छोटा फोटो वापरण्यात आला आहे तर अजितदादांचा फोटोच गायब आहे. या प्रकरणावर पत्रकारांनी जेव्हा प्रफुल्ल पटेल यांना छेडले. त्यावर पटेलांनी उत्तर देणं टाळले. प्रफुल्ल पटेल यांनी, आता राहू द्या सगळं हे... असे म्हणत त्यांनी या विषयावर बोलण्यास स्पष्ट नकार दिला. प्रफुल्ल पटेल यांच्या वक्तव्याने मात्र राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. ज्या नेत्याच्या नावावर आणि कर्तृत्वावर हा गट उभा राहिला, त्यांच्या निधनानंतर अवघ्या काही दिवसांतच त्यांना बॅनरवरून गायब करणे हा कृतघ्नपणा असल्याची टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाने केली आहे.

## अंतरंग



### राष्ट्रवादीची वाटचाल कोणत्या दिशेने?




राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे अध्यक्ष खा. शरद पवार हे सतत सत्तेच्या परिघात वावरणारे नेते समजले जात असल्यामुळे बदलत्या राजकीय परिस्थितीत ते भाजपशी जुळवून घेतील असे नेहमीच बोलले जाते. परंतु गेल्या पाच वर्षांत तरी आणि विशेषत: राष्ट्रवादी फोडल्यानंतर मात्र शरद पवारांनी भाजपशी कुठेच सलगी होईल असे निर्णय घेतले नव्हते. त्यांनी विरोधातच बसून महाविकास आघाडी मजबूत ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अजितदादा राष्ट्रवादीच्या राजकीय सलगी आणि गेल्या काही महिन्यांपासून जि. प. महापालिका, नगरपालिका निवडणुकांमध्ये मात्र जुळते घेण्याचा प्रयत्न पवार आणि त्यांच्या सर्थकांनी केला. त्यातूनच दोन्ही राष्ट्रवादी एकत्र यावी अशी त्यांच्या पक्षातील अन्य अनेक नेत्यांचीही तीच इच्छा होती. परंतु शरद पवारांनी भाजपसोबत जाणे शेवटच्या क्षणी का होईना; परंतु नेहमीच टाळले.

सन २०१९ च्या निवडणुकीनंतरही भाजप-राष्ट्रवादीचे सरकार स्थापन करण्याचे बरेच प्रयत्न झाले, एवढेच नव्हे तर अजित पवारांनी फडणविसांसोबत शपथविधीही उरकला: परंतु पुन्हा एकदा शरद पवारांनी आपला निर्णय बदलला. अजित पवारांना माघार घ्यावी लागली. कालांतराने अजित पवारांनी पक्षात बंड करून भाजप सोबत सत्तेत सामील होण्याचा निर्णय घेतला. पक्षाचे बहुतांश आमदार अजित पवारांसोबत गेले. निवडणूक आयोगानेही अजित पवारांच्या पक्षालाच मूळ राष्ट्रवादी म्हणून मान्यता दिली. दरम्यानच्या काळात पुलाखालून बरेच पाणी वाहून गेल्यानंतर अजित पवारांनी दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाचे प्रयत्न सुरू केले, या प्रयत्नांना शरद पवारांचाही पाठिंबा होता. विलीनीकरणानंतर पक्षाचे स्वरूप कसे असेल याचे तपशील निश्चित झाले, अगदी विलीनीकरणाचा मुहूर्तही ठरला: परंतु दुर्दैवाने हे विलीनीकरण प्रत्यक्षात येण्यापूर्वीच अजितदादांचे अपघाती निधन झाले. अजितदादांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतील असेच बोलले जात होते: परंतु अजित पवारांच्या पक्षातील काही ज्येष्ठ नेत्यांनी सुनेत्राताईंना पक्षाचे नेतृत्व करण्याची गळ घातली, त्यांनीही ती मान्य केली आणि विलीनीकरणाच्या चर्चांना विराम मिळाला; परंतु गेल्या काही दिवसांमध्ये अजित पवारांच्या राष्ट्रवादीतही कुरबुरी सुरू झाल्याच्या बातम्या येऊ लागल्या.

सुनेत्राताईंना प्रफुल्ल पटेल आणि तटकरेंचे प्रभुत्त्व मान्य नसल्याची चर्चा होऊ लागली. बारामतीच्या मेळाव्यात पंतप्रधान मोदी, अमित शाह यांच्यासोबतच शरद पवारांचेही छायाचित्र बॅनरवर दिसून आले. त्यामुळे पटेल, तटकरेंना डावलून सुनेत्राताई पवार या विलीनीकरणाचा निर्णय घेण्याच्या तयारीत असल्याच्या चर्चा सुरू झाल्या. परंतु शरद पवारांनी सुनेत्राताईंच्या प्रचारात बॅनरवर आपले छायाचित्र वापरण्यावर आक्षेप घेत विलीनीकरणाची चर्चा अजित पवारांच्या पक्षास-ोबत जाण्यासोबतच थांबली असल्याचे सांगत या सगळ्या शक्यतांवर पूर्णविराम लावल्याचे दिसते. अजित पवारांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांच्याकडे सारी सूत्रे आली असली तरी पार्थ पवार यांचे पक्षात प्रस्थ वाढले आहे. या पृष्ठभूमीवर पार्थ पवारांवर शरद पवारांनी अपरिपक्व म्हणून टीका केल्याने दोन्ही पक्षात अजूनही तणाव कायम असल्याचे दाखवून दिले. त्यातच विलीनीकरणापूर्वी अजित पवार गटाला आमच्याशी चर्चा करावी लागेल, असे विधान करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन राष्ट्रवादीच्या विलीनीकरणात पाचर मारली आहे. यासाठी सुनेत्रा पवार या विलीनीकरणास अनुकूल असल्याचे बोलले जात आहे. परंतु त्यांच्या पक्षातील काही नेत्यांना विशेषत: कार्याध्यक्ष खा. प्रफुल्ल पटेल व प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्यासह समर्थकांना हे विलीनीकरण नको आहे आणि या नेत्यांना भाजपची साथ आहे. त्यातून राष्ट्रवादी अजित पवार गटावर भाजपचा पूर्ण रिमोट कंट्रोल असल्याचे जाणवू लागले आहे. पटेल, तटकरे जोडगोळी भाजपला अनुकूल अशी भूमिका घेत आले आहेत. राष्ट्रवादीची ताकद वाढू नये, असाच भाजपचा प्रयत्न आहे. भाजपने राष्ट्रवादीचा गड मानल्या जाणाऱ्या पश्चिम महाराष्ट्रातही आपली ताकद आता वाढविली आहे. विशेषत: पुणे, सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूरमध्ये सत्ताकेंद्रे काबिज करण्यापर्यंत मजल भाजपने मारली आहे. त्यामुळे पुढच्या काळात भाजपला राष्ट्रवादीची तेवढी गरज भासणार नाही; परंतु दोन्ही राष्ट्रवादी एकत्र आल्यास भाजपची डोकेदुखी वाढू शकते. त्यामुळे पुढच्या लोकसभा निवडणुकीपर्यंत तरी राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाची शक्यता दिसत नाही. शरद पवार गटाने 'एनडीए'मध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला तरच विलीनीकरणाची चर्चा होऊ शकते; परंतु ती शक्यता सध्या तरी कमीच आहे. पुढच्या निवडणुकीच्या वेळी कार्यकर्त्यांच्या दबावामुळे दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येतीलही; परंतु तोपर्यंत भाजपच्या खेळीमुळे राष्ट्रवादीतील काही नेते भाजपवासी, काही काँग्रेसवासी होऊन राष्ट्रवादीची ताकद खिळखिळी झालेली असेल. म्हणूनच सध्या तरी भाजपला म्हणा किंवा सत्तेला डावलून सुनेत्रा पवार राष्ट्रवादीच्या विलीनीकरणासाठी तयार होणार नाही, असेच दिसते: परंतु भाजपचे राजकारण बघता पुढच्या काळात दोन्ही राष्ट्रवादीसमोर अस्तित्वाचे आव्हान उभे ठाकण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**– संदीप संकपाळ**

## पंचांग

विक्रम संवत्- २०८२ चैत्रशके संवत्- १९४८
संवत्सर -पराभवनाम अयन- उत्तरायणारंभ मास- चैत्र
ऋतु- सौर वसंत कृष्ण पक्ष तिथि : सप्तमी २१:१९:५४
नक्षत्र : मूल ०८:४८:११ योग : परिध १७:५७:३४
करण:विष्टि ०८:१२:५२ करणबव २१:१९:५४
सूर्य : मीन चन्द्र : धनु हिजरी सन् - १४४६ मुस्लिम मास - शव्वाल
तारीख - २० विशेष मळाई - वडजाईदेवीची यात्रा - चिंचोली - पारनेर (अहिल्यानगर)

## राशी भविष्य...

**मेष** – लेखी कागदपत्राशिवाय मोठे व्यवहार करणे म्हणजे अंधाऱ्या खाईत उडी घेण्यासारखे होईल. आपले कोणतेही प्रश्न विचारपूर्वक सोडवा. लोकांशी संप वाढल्यामुळे आपली कामे पार पडतील.

**वृषभ** – नोकरी-व्यवसायासंबंधीचे उच्च ज्ञान किंवा नवे तंत्रज्ञान अत्यंत फायदेशीर ठरेल. महिलांना प्रगतीचा विशेष टप्पा गाठता येईल. टाळत असलेले कामे पुर्ण होण्याचा योग आहे.

**मिथून** – पैशाची कामे मात्र मनासारखी मिळू शकतील. आपापल्या क्षेत्रात योग्य गुरू भेटतील. दूरचे प्रवास हितकारक ठरतील. नवीन व्यवसायास सुरूवात करू शकता. नम्रता ठेवल्यामुळे व्यवहारात हमखास यश मिळेल.

**कर्क** – व्यवसाय-विस्ताराच्या नव्या संधी आकर्षित करतील. भागीदारीचे प्रस्ताव फायदेशीर ठरतील. सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल.राजकारणात चांगली संधी मिळण्याची आवश्यकता आहे. परमेश्वरावरील विश्वास दृढ होईल.

**सिंह** – आर्थिक ओघ मंद असला तरी त्यात नेमकेपणा मात्र राहील. खर्चाची सोय करता येईल एवढे उत्पनन नक्की चालू राहील. संततीकडून चांगल्या बातम्या कळाल्यामुळे आनंदी रहाल.

**कन्या** – वैवाहिक जोडीदाराच्या मदतीने काही आनंदाच्या घटना घडू शकतील. जोडीदाराच्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. कामकाजामध्ये व व्यापारात विचारपूर्वक निर्णय घ्या.

**तूळ** – आपल्या आवडीच्या गोष्टीसाठी वेळ काढावा लागेल. त्यातून पुरेसा आनंद मिळू शकेल. उत्पन्नाचा नवा मार्ग मिळेल. तणावमुक्त होऊन कार्य करा. व्यावसायिक स्पर्धेत यश मिळण्याचे योग आहेत.

**वृश्चिक** – एखाद्या जवळच्या मित्राची नाराजी अस्वस्थ करील. मुलांचे वागणे बेचैनी वाढविल. यातूनही मार्ग सापडत राहील. आर्थिक बाबतीमधील प्रकरणे आज सुरळीत पार पडतील.

**धनू** – नव्या घराचे स्वप्न बऱ्याच अंशी आकाराला येईल. येणारी आवक बऱ्याच अंशी निर्धोक राहील. व्यावहारीक समस्यांमुळे आपण त्रस्त व्हाल. धैर्याने आणि संयमाने कामे कराल.

**मकर** – सासूरवाडीची वेळीच मिळालेली मदत अमूल्य ठरेल. व्यवसाय विस्तार यातून प्रसन्न घटना घडतील. व्यवसायात किंवा रोजगारात मोठे परिवर्तन घडून येण्याची शक्यता आहे.

**कुंभ** – आपले कोणतेही प्रश्न विचारपूर्वक सोडवा. सरकारी कामातील दिरंगाई महागात पडेल. वृध्दांचे आजारपण पळापळ वाढवील. प्रतिष्ठित व्यक्तींची भेट आपल्यासाठी फायदेशीर ठरणार आहे.

**मीन** – नोकरावर किंवा हाताखालील व्यक्तीवर टाकलेला जास्तीचा विश्वास त्रासदायक ठरेल. हितशत्रूपासून त्रास होणे शक्य. सामजिक कामात वेळ जाईल. अचानक लाभ होण्याचा योग आहे.

## पारावरचा फड



इराक अन् इराणच्या अमेरिकेच्या सहभागातून सुरू युद्धाला विरामाचा अखेर मुहूर्त लागल्याची चर्चा सुरू झालीय. दोघांनीही शस्त्रसंधीबाबत दोन दिवसांत निर्णयाची तयारी दर्शविली आहे. सोबतच इराणने होमुर्झ येथून समुद्रामार्गे इंधन वाहतुकीलाही खुली सूट दिल्याचे दिसून येत आहे. एकूणच काय का होईना, किमान या युद्धाच्या माध्यमातून देशभरात गॅस आणि पेट्रोल, डिझेल टंचाईचे सावट आता तरी हटेल अशी आशा आहे. यामध्ये हॉटेल, खाद्यपदार्थ विक्रेत्यांची गॅसबंदीमुळे झालेली कोंड फुटेल अशी आशा आहे. वास्तविक शासनाकडून कोणतीही टंचाई नाही असे सांगून वेळ मारून नेण्याचा उद्योग सुरू होता, मात्र त्या नावे ब्लॅकमेलिंगचा धंदा जोरात सुरू होता, त्यालाही आता आळा बसेल अशी आशा आहे. एकूणच या परिस्थितीबाबत पारावरची चर्चा !

**पांडूनाना :** आरं त्या इरान-इराक आन् आमेरिकेच्या युद्ध आन् तोफबाजीनं समद्या जगाची कोंडीच झाली हुती बग. आता ती मिटतीया वाटतं.

**पांडूनाना :** व्हय, आता ते टरंप आन् तिकडनं इरानवालं बी शसतरं खाली ठेवाय तयार झाल्याती. पर त्येच्यावं कायमचा युद्धविराम हुईल का न्हाय ह्येची काळजी हाय बग.

**बाबूराव :** ते काय का हुईना, तातपुरतं थांबलं तरी इंदन आन् गॅसची टंचाई मिटंल वाटतंया.

**पांडूनाना :** व्हय, त्यामुळं हाटीलं, खाद्यपदारथं बनिवनारं आन् इकनाऱ्यांची मोटी गोची झाली हुती. कायजनानी तर आता त्येला चुलीचा बी ऑपशन ठेवला हुता. आता ते काय करत्यात कुनास ठावूक.

**बाबूराव :** आरं, का करनार न्हायती. पंदराशेचा गॅस पैकं दिवून बी चार-चार हाजाराला. त्योबी मिळत न्हवता. हिकडं परशासन मातुर म्हंतं समदं आलबेल.

**पांडूनाना :** पर म्या म्हंतु ह्यातनं म्हागाई वाडिवली ती कमी हुनार काय.

**बाबूराव :** आरं गॅसचं दर तर कमी हुत्याल. ते येळंत बी मिळत्याल म्हनं.

**पांडूनाना :** आता गॅस आन् समदं मिळंल आशी आशा हाय. त्या टरंप आन् इरानवाल्यानी मिटवलं तर बरं.

**बाबूराव :** आता त्या होमुरझमदनं समुदरातनं गॅस, इंदान आनाय परवानगी दिल्या म्हनं की.

**बाबूराव :** म्हजी आता चुली बंद हुत्याल म्हन.

**पांडूनाना :** त्ये काय सोयीचं न्हवतं, जे चुलीचं मारकेटींग करत हुती त्येंची बी हौस फिटली.

**बाबूराव :** पर हे समदं ठिकाय, पर ज्या चुलीच्या नावानं पदारथाचं दर वाडिवलं ते कमी हुनार का?

**पांडूनाना :** आसं कसं कमी हुनार?

**बाबूराव :** भाज्या, समदं म्हागलं की दर वाडत्यात. पर ते सस्त झाल्यावं कदी कमी झाल्यात का?

**पांडूनाना :** म्हजी म्हागई वाडतीच! **– अमृत चौगुले**

## उपदेश कथा



### फळ उपकाराचे

एका लांडग्याने एक हाडूक गिळले. ते काढून घेण्याकरिता तो कोणाला तरी शोधित होता. एका बगळ्याला पाहून तो म्हणाला, 'अहो बगळेदादा, माझ्या घशातलं हे हाडूक काढलंत तर मी तुम्हाला बक्षीस देईन. मग बगळ्याने पुढे होऊन लांडग्याच्या घशात आपली चोच घातली आणि हळूच हाडूक बाहेर काढले. त्याचे बक्षीस मागितल्याबरोबर लांडगा म्हणाला, 'अरे, एका लांडग्याच्या तोंडातून तुझी चोच सुरक्षित बाहेर निघाली यात तुला समाधान नाही काय? शिवाय वर आणखी तुला बक्षीस पाहिजे?

**कथा उपदेश : दुष्ट माणसाला मदत केली तर तो आपल्याला अधिक संकटात टाकीत नाही, यावरच समाधान मानायला पाहिजे.**

## दिनविशेष...



**आंतरराष्ट्रीय**

०९९९ - गरब्रट याची पहिले फ्रेंच पोपपदी नियुक्ती.
१८६५ - फीडीरल पीकेट याने जनरल ए.पी. हील यांची हत्या केली.
१९८६ - ग्रीस येथे अथेंस विमानतळावर बॉम्बस्फोटात ४ अमेरिकी प्रवासी ठार झाले.
२००७ - प्रशांत महासागरातील सोलोमन या बेटाजवळ झालेल्या तीव्र भूकंपानंतर आलेल्या सुनामीमध्ये ८ जण ठार तर अनेक जण बेपत्ता झाले.
२००७ - पूर्व श्रीलंकेत खचाखच भरलेल्या एका बसमध्ये संशयित तमिळ बंडखोरांनी केलेल्या बॉम्बस्फोटात १५ ठार तर २५ जण जखमी झाले.

**राष्ट्रीय**

१८७० - सार्वजनिक सभेची स्थापना.
१८९४ - राजर्षि शाहूंकडे राज्यकारभाराची सूत्रे.
१९७० - मेघालयाला स्वतंत्र राज्याचा दर्जा.
२००६ - आंध्र प्रदेशात पोलिसांसमवेत झालेल्या चकमकीत ५ माओवादी ठार झाले.
२००६ - आर्थिक वर्षात भारताची निर्यातीने पहिल्यांदा शंभर अब्ज डॉलर्सचा आकडा ओलांडला.
२००८ - भारतीय जनशक्ती पार्टी (भाजश)च्या सहा प्रदेशाध्यक्षांनी एका बैठकीत उमा भारती यांचे नेतृत्व नाकारुन प्रल्हाद पटेल यांची अध्यक्षपदासाठी निवड केली.

## मुलांना जपणार कसे...?

सध्या गाजत असलेलं प्रकरण अशोक खरातचं. त्या प्रकरणाची स्याही वाळते न् वाळते. तोच नागपूरात घडलं एका लहान बालकाचं हत्याकांड. गिट्टीखदान या भागात राहणाऱ्या निरपराध लहान बालक असलेल्या अथर्वचा गळा घोटून मारेकऱ्यांनी हत्या केली व खंडणीचं कारण पुढं केलं. म्हणतात की अशोक खरातनं भोंदूगिरी करीत अनेक नरबळीही घेतले. ज्यात लहान मुलांचा समावेश असू शकतो. तसं पाहिल्यास माणूस आज कितीही शिकला असला तरी तो शहाणा झालेला नाही. तो आजही अंधश्रद्धेच्या आहारी गेलेला असून आजही अंधश्रध्दाच पाळतो. हे एकंदर त्याच्या वर्तनावरुन दिसून येते. तर नागपूरात अथर्वसारख्या लहान मुलांची हत्या होण्यातून आता लहान मुलंही सुरक्षीत नाहीत याचा प्रत्यय येतो. त्यातच आता प्रश्न पडलेला आहे की आपल्याला असलेल्या लहान मुलांना मुलांना जपावं कसं? आज मुलांना जपा, असं म्हटल्यास आतिशयोक्ती होणार नाही. तसंच घडलंय नागपूरात. तशी नागपूरात अपहरणाची बरीच प्रकरणं घडली. चार प्रकरणं लहान लहान बालकांबाबत घडली. ज्यात आदित्य, युग, कुश आणि आता अथर्व. गिट्टीखदानचा रहिवाशी असलेला मुलगा. बिचारा खंडणीतून पैसे मिळविण्याच्या हव्यासापोटी मारल्या गेला. काय दोष होता त्याचा? काहीच नाही. परंतु वाईट प्रवृत्ती अशीही उफाळते व त्यातून निरपराधांचा अंत होतो.

**–संयोगिता पाटील, सांगली.**

## जन की बात...



### सांगली सिव्हीलचा जेष्ठ नागरिक कक्ष मार्गदर्शक



गेल्या १४ वर्षापासुन सांगलीच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेला जेष्ठ नागरिक कक्ष हा सर्व जेष्ठ नागरिकांचा भक्कम आधार बनलेला आहे. विशेषत: ग्रामीण भागातून आलेल्या जेष्ठ नागरिकांना सांगली सिव्हिल रुग्णालयामधे उपचारासाठी आल्यावर ते घाबरून गोंधळून जातात, त्याना औषधोपचारासाठी कोठे जायचे कसे जायचे हे समजत नाही, ते कावरे बावरे होऊन थांबलेले असतात, पण त्यांना जो आधाराचा पाठीवर हात पडतो तो गेल्या २३ वर्षापासुन सेवा देणारया व मार्गदर्शन करणाऱ्या सेवा निवृत्त मेडिकल सुपरवायझर दत्तात्रय कुलकर्णी यांचेसह सेवा निवृत्त जवान महादेव थोरात, शांताराम साळुंखे यांच्यासह ज्यांचे मार्गदर्शनाखाली हे जनहिताचे कार्य अखंडपणे चालु आहे.

ते सांगली सिव्हिल चे अधिष्ठाता मा. डॉ. प्रकाश गुरव व समाजसेवा अधिक्षकसंजय खाडे यांचा, या सर्वाना या सामाजिक कार्याबद्दल धन्यवाद द्यावे तेवढे थोडेच आहेत. जेष्ठ नागरिक कक्षातून जेष्ठाना त्यांचे केस पेपर काढणे अपंगांचे अर्ज भरणे, सरकारी योजनांची व मोफत उपचारांची माहिती देणे, तसेच देहदान त्वचादान, नेत्रदान संबंधी माहिती देवुन त्याच महत्व पटवण, या सर्व समाज उपयोगी उपक्रमासाठी मोलाच योगदान या जेष्ठ नागरिक कक्षातून चोखपणे बजावल जात आहे. आजच्या या बदलत्या काळामध्ये, विभक्त कुटुंब पध्दतीमुळे अनेक जेष्ठ नागरिक वारसा कडून वाऱ्यावर सोडलेले पहायला मिळतात, या कक्षाच्या माध्यमातून त्याना मोठा दिलासा मिळत आहे, आज अनेक जेष्ठ नागरिक संघटना कार्यरत आहेत त्यांनी या जेष्ठ नागरिक कक्षाचे प्रेरणादायी कार्यासाठी आपला सहभाग सक्रीयपणे नोंदवावा. व जेष्ठ नागरिकांचे जीवन सुखकर होण्यासाठी दिलासा द्यावा.

**–शशिकांत गायकवाड, सांगली**

## भारत-नेपाळ संबंध सुधारतील..?

राम नवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे कारण पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतल्या पासून त्यांनी भारताविरुध्द एकही वक्तव्य केले नाही अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारत विरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर आपल्या पंतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन केले. त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशात मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. अर्थात त्यांच्याकडून तशी अपेक्षा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा आणि आपले खूप जवळचे संबंध आहेत. बालेंद्र शहा यांचे शिक्षण भारतातच झाले आहे. त्यांनी बंगळुरूच्या विश्वेश्वरय्या युनिव्हर्सिटीमधून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले आहे. त्यांची एक बहीण बंगळुरूमध्येच राहते त्यामुळे भारताबाबत त्यांच्या मनात निश्चितच आदर असेल. भारतानेही याबाबत कुटनितीक पावले टाकून बालेंद्र शहा यांना भारताकडे वळवण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लवकरात लवकर नेपाळचा दौरा करून बालेंद्र शहा यांची भेट घ्यावी त्यामुळे दोन्ही देशात बिघडलेले संबंध पूर्ववत होतील आणि दोन्ही देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील.

**–श्याम ठाणेदार,पुणे**

# आयटी कंपन्यांतील मुलींना लक्ष्य करून अत्याचाराचे गंभीर आरोप; सखोल चौकशीची मागणी

## भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांचा दावा; नाशिकमधील कंपनीचे उदाहरण देत 'कॉर्पोरेट जिहाद'चा उल्लेख

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** आयटी कंपन्यांमध्ये कार्यरत असणाऱ्या उच्चशिक्षित मुलींवर नियोजनबद्धपणे लैंगिक अत्याचार होत असल्याचा गंभीर आरोप भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी केला आहे. सध्या 'लव्ह जिहाद' सारखाच 'कॉर्पोरेट जिहाद' समोर आला आहे. त्यात आयटी कंपन्यांत कार्यरत असणाऱ्या उच्चशिक्षित मुलींना लक्ष्य करून त्यांच्यावर नियोजनबद्धपणे लैंगिक अत्याचार होत आहे. त्यामुळे मुलींनी सतर्कता बाळगणे गरजेचे आहे, असे ते म्हणालेत.

गोपीचंद पडळकर यांनी आज पुण्यात एका पत्रकार परिषदेला संबोधित केले. त्यात त्यांनी उपरोक्त खबळजनक आरोप केला. ते म्हणाले, नाशिक हे आयटी हब नसले तरी तिथे काही आयटी कंपन्या आहेत. पुणे हे मोठे आयटी हब आहे. आयटी कंपन्यांमध्ये काही गैरप्रकार घडत असल्यास संबंधित कंपनी अधिकाऱ्यांनी त्याची पडताळणी करणे आवश्यक आहे. नाशिक येथील एका कंपनीत एका तरुणाचा धर्मांतराचा प्रकारही समोर आला आहे.

**नाशिकच्या कंपनीचे दिले उदाहरण**

नाशिकमधील एका नामांकित मल्टीनॅशनल कंपनीत मुलींना लक्ष्य करून त्यांचे लैंगिक शोषण केले जात असल्याचा दावाही पडळकर यांनी यावेळी केला. ते म्हणाले, सदर कंपनीत १३० कर्मचारी काम करतात. लैंगिक अत्याचारामुळे अनेक मुलींनी नोकऱ्या सोडल्या. पण त्यातील नऊ पीडित मुलींनी धाडस दाखवून पुढे येत पोलिसांकडे तक्रारी दाखल केल्या आहेत. मागील दोन ते तीन वर्षांपासून हा प्रकार सुरू असून हे प्रकरण अतिशय गंभीर आहे.



**टीम लीडर्सना मुलींना जाळ्यात अडकवण्याचा टास्क**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने भोंदू अशोक खरात प्रकरण बाहेर आले. त्यानंतर नाशिक पोलिसांनी आणखी एक प्रकरण शोधून काढले आहे. सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एसआयटी (विशेष तपास पथक) नेमली आहे. कॉर्पोरेट कंपनीच्या संदर्भात टीम लीडर्सना टास्क ठरवून दिला जात असे. ते मुलींची मुलाखत घेऊन नोकरीसाठी शिफारस करत आणि त्यानंतर त्यांच्यावर दबाव टाकत. नोकरी कोणी लावली हे सांगणे, सुट्टी देण्यासाठी दबाव टाकणे, तसेच विविध रिसॉर्टमध्ये सुट्टीच्या दिवशी फिरावयास घेऊन जाणे असे प्रकार घडत होते. इर्मजिका येथे कंपनीतील मुलींना फिरण्यास घेऊन जाण्याच्या बहाण्याने एका तरुणीला जाळ्यात ओढून तिच्यावर तिघांनी नियोजनबद्ध लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकारही उघडकीस आला आहे. या प्रकरणात आरोपींवर मकोका कायद्यानुसार गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली.

# टाकळी भीमाच्या लेकींची उत्तुंग भरारी! ऋतुजा वडघुले एमपीएससी परीक्षेत यशस्वी, तर जिद्दीच्या जोरावर वैष्णवी शितोळे बनली 'महाराष्ट्र पोलीस'

■ जनप्रवास प्रतिनिधी

**टाकळी भीमा :** शिरूर तालुक्यातील टाकळी भीमा येथील दोन कन्यांनी आपल्या जिद्दीच्या जोरावर यशाला गवसणी घालत गावाचे नाव सुवर्णअक्षराने कोरले आहे. ऋतुजा किसन वडघुले हिने एमपीएससी (MPSC) परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश मिळवले आहे, तर अत्यंत गरीब कुटुंबातील वैष्णवी ज्ञानेश्वर शितोळे हिने सर्व संकटांवर मात करत 'महाराष्ट्र पोलीस' दलात स्थान मिळवून खाकी वर्दीचे स्वप्न पूर्ण केले आहे.



ऋतुजा वडघुले हिने स्पर्धा परीक्षेच्या क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. तिचे प्राथमिक शिक्षण टाकळी भीमा (बाळोबाची वाडी ) येथील जिल्हा परिषद शाळेत झाले, तर माध्यमिक शिक्षण निमगाव म्हाळुंगी येथील विद्या विकास मंदिरमध्ये झाले. दहावीत विद्यालयात प्रथम येण्याचा मान मिळवणाऱ्या ऋतुजाने शिरूरच्या विद्याधाम प्रशालेतून बारावी (विज्ञान) पूर्ण केली. त्यानंतर तळेगाव ढमढेरे येथील साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालयातून इंग्रजी विषयात पदवी संपादन केली. पदवीचे शिक्षण घेत असतानाच तिने कोणत्याही महागड्या कोचिंग क्लासशिवाय, केवळ स्वयंभ्यासाच्या जोरावर पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवले. तिच्या या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ती एक आदर्श ठरली आहे.

गावातील दुसरी सुकन्या वैष्णवी शितोळे हिचा पोलीस दलातील प्रवेशाचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. वैष्णवीचे कुटुंब अत्यंत गरीब असून तिचे आई-वडील मजुरी करून घराचा उदरनिर्वाह करतात. घरची परिस्थिती हलाखीची असतानाही वैष्णवीने जिद्द हारली नाही. यापूर्वीच्या भरती प्रक्रियेत तिची निवड केवळ एका गुणाने हुकली होती. कोणत्याही सामान्य मुलीने कदाचित हार मानली असती, पण वैष्णवीने खचून न जाता पुन्हा जोमाने सराव केला. मजुरी करणाऱ्या आई-वडिलांच्या या लेकीने अखेर आपल्या कष्टाच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात भरती होऊन खाकी वर्दीचे स्वप्न सत्य करून दाखवले. एकाच वेळी गावातील दोन मुलींनी प्रशासकीय आणि पोलीस दलात मिळवलेल्या या यशाबद्दल संपूर्ण शिरूर तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. "शिक्षकांची प्रेरणा आणि आई-वडिलांच्या आशीर्वादानेच आम्ही हे यश मिळवू शकलो," अशी भावना या दोघींनी व्यक्त केली. या दोन्ही लेकींच्या यशाने गावातील इतर मुलींच्या स्वप्नांना नवी दिशा मिळाली असून, "टाकळी भीमाच्या मातीने केवळ शेतकरीच नव्हे, तर जिद्दी अधिकारी आणि पोलीसही घडवले आहेत," असा विश्वास आता पंचक्रोशीत व्यक्त होत आहे. त्यांच्या या उत्तुंग यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस ग्रामस्थांनी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# आंबेगाव, जुन्नर तालुक्यात मोटारसायकल चोरी करणारा सराईत चोरटा जेरबंद

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निरगुडसर :** जुन्नर व आंबेगाव तालुक्यात वाढलेल्या मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालत स्थानिक गुन्हे शाखा आणि घोडेगाव पोलीस ठाण्याच्या पथकाने संयुक्त कारवाई करत सराईत चोरट्याला अटक केली आहे. आरोपीकडून चार मोटारसायकली व एक मोबाईल असा एकूण १ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून पाच गुन्हे उघडकीस आले आहेत.



मंचर, घोडेगाव, नारायणगाव व ओतूर परिसरात मोटारसायकल चोरीचे प्रमाण वाढल्याने पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल यांनी स्थानिक गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळांवरील सीसीटीव्ही फुटेजचा अभ्यास करून तपास सुरू ठेवला. तपासादरम्यान सर्व ठिकाणी एकाच इसमाचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. दरम्यान, गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार संबंधित आरोपी चोरीच्या मोटारसायकली विक्रीसाठी घोडेगाव-नारोडी फाटा येथे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव राहुल अशोक दाते (वय २५, रा. मंचर, ता. आंबेगाव) असे सांगितले. पोलिसांनी आरोपीकडून घोडेगाव, मंचर, नारायणगाव व ओतूर येथून चोरीस गेलेल्या चार मोटारसायकली तसेच एक मोबाईल जप्त केला. सदर आरोपीला पुढील तपासासाठी घोडेगाव पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आले असून अधिक तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल्ल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सपोनि महादेव शेलार, सागर पवार (घोडेगाव) तसेच त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# चैतन्य नगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

■ जनप्रवास प्रतिनिधी

**ओतूर :** ओतूर येथील चैतन्य नगर वस्तीमध्ये बोरूबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठेच्या निमित्ताने अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहामध्ये ह.भ.प. पोपट महाराज खंडागळे, परमेश्वर महाराज फपाळ, महेंद्र महाराज नलावडे महाराजांची कीर्तने झाली. तसेच समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख यांच्या काल्याच्या किर्तनाने सप्ताहाची सांगता झाली.

पायी नर्मदा परिक्रमा केलेले सुनील महाराज डुंबरे आशा सुनील डुंबरे तसेच सुभाष महाराज नलावडे यांचा सत्कार ह.भ. प. निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आला त्याचप्रमाणे मंडळाचे ज्येष्ठ सभासद सहादू विठ्ठल डुंबरे यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा संपन्न करण्यात आला या विषयी बोलताना मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. गंगाराम महाराज डुंबरे आणि सचिव अंबादास डुंबरेसर यांनी सांगितले की, श्री संत बोरूबाबा यांची समाधी चैतन्य नगर येथे असून त्यांनी सर्व धर्म समभावची शिकवण दिली



उत्सवाचे हे ३० वे वर्ष आहे. या सप्ताहास भेट देण्यासाठी ओतूर ग्रामविकास मंडळाचे अध्यक्ष तथा कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे संचालक धनंजय डुंबरे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या छाया तांबे, नवनिर्वाचित पंचायत समिती सदस्य प्रशांत डुंबरे, कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेचे सचिव महेंद्र उर्फ ( गांधी ) पानसरे, रोहोकडीचे माजी सरपंच सुदाम घोलप,जय बजरंग सेवा गणेश मंडळाचे सचिव धोंडीभाऊ मोरे, दत्ता वाघ,अर्जुन हांडे, ह.भ.प राजेंद्र महाराज फापाळे, ह.भ.प.सुरेखा लोंढे,ह.भ.प धोंडीभाऊ महाराज पानसरे, उद्योजक जयवंत डुंबरे,शरद गाढवे, बबनराव भोरे, राष्ट्रवादी काँग्रेस जुन्नर तालुका अध्यक्ष तुषार थोरात,ओतूर तंटामुक्तीचे अध्यक्ष अनुराग फापाळे,निवेदक राजू शिंदे, प्रकाश फापाळे, संतोष पानसरे आदी मान्यवर उपस्थित होते काल्याच्या कीर्तनानंतर बोरूबाबाचा यात्रा उत्सव साजरा करण्यात आला.

ह.भ.प गंगाराम महाराज डुंबरे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

# श्रीगुरुनाथ नागरी सहकारी पतसंस्थेला ३४ लाख ३४ हजारांचा नफा

■ जनप्रवास वार्ताहार

**टाकळी हाजी :** श्रीगुरुनाथ नागरी सहकारी पतसंस्था वडनेर खुर्द, ता.शिरूर जि.पुणे या पनसंस्थेला चालू अर्थिक वर्षात ३४ लाख ३४ हजार रूपये नफा मिळाला असून वडनेर खुर्द व परिसरातील आसपासच्या गावातील व्यवसायिक, उद्योजक, सभासद, ठेविदार, हितचिंतक यांनी मोठ्या प्रमाणात पाठबळ दिल्याने या पतसंस्थेचा पुणे व अहिल्यानगर कार्यक्षेत्रात विस्तार झालेला आहे. सदर पतसंस्थेचा शाखा विस्तार जांबुत, फाकटे, पिंपरखेड तसेच कवठे येमाई या दिकाणी झालेला आहे. पत्तसंस्थेच्या खातेदार यांना कोअर बँकींगद्रे कोणत्याही शाखेतून व्यवहार करता येता. तसेच आर. टी. जी. एस, एन, ई, एफ, टी व आय. एम. पी. एस सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेच्या ग्राहकांसाठी क्यु,



आर. कोड सिस्टीम संस्थेने उपलब्ध करून दिलेली आहे. त्याच बरोबर संस्थेत विजबिल भरणा, मोबाईल बँकिंग, दररोज सोनेतारण सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेला आय. एस. ओ मानांकनांचा दर्जा प्राप्त झालेला आहे.

संस्थेची आर्थिक माहिती देताना संस्थेचे अध्यक्ष नवनाथ किसन राऊत (सर) यांनी सांगितले की संस्थेच्या ठेवी – १२ कोटी ३ लाख, कर्ज – १० कोटी ८३ लाख, गुंतवणुक ३ कोटी ९० लाख, निधी– १ कोटी ४ लाख व भागभांडवल – ९२ लाख ५२ हजार, नफा ३४ लाख ३४ हजार, थकबाकी ५.३८% अशाप्रकारे संस्था प्रगतीपथावर आहे. श्री. गुरुनाथ नागरी सहकारी पतसंस्था वडनेर खुर्द संस्थेच्या प्रगतीसाठी व्यवसायिक, उद्योजक, व्यापारी, ग्रामस्थ व हितचिंतक यांनी मोठ्या प्रमाणात पाठबळ दिलेले आहे. संस्थेचे पदाधिकारी, संचालक मंडळ, अधिकारी व कर्मचारी अतिशय शिस्तबद्ध व निस्वार्थी पध्दतीने काम करीत आहे. अध्यक्ष नवनाथ राऊत, उपाध्यक्ष पांडुरंग एकनाथ निचित व सचिव राजेंद्र माणिक उंडे तसेच संचालक मंडळ अनुभवी व अभ्यासु असल्याने श्री. गुरुनाथ नागरी सहकारी पतसंस्था विकासाचा आलेख सातत्याने उंचावत असल्याची प्रतिक्रिया जनतेतून व्यक्त होत आहे.

# मीना सिंचन शाखा कालव्यावरील पाणी वापर संस्थांची पाणीपट्टी वसुली आदर्शवत

■ जनप्रवास वार्ताहार

**टाकळी हाजी :** मीना शाखा कालव्या अंतर्गत एकूण तीन शाखा येत असून २०२४२०२५ शाखा निहाय वसुली पुढील प्रमाणे १) टाकळी हाजी शाखा एकूण आठ पाणी वापर संस्था पाणीपट्टी वसुली =३,६३,२७५ , २) जांबुत शाखा एकूण नऊ पाणी वापर संस्था वसुली =८१८००० ३) शिरोली तर्फे आळे शाखा एकूण एकूण सहा पाणी वापर संस्था वसुली=७६४००० मार्च अखेर पाटबंधारे विभागाकडे जमा करण्यात आली यामध्ये टाकळी हाजी शाखेतील गुरुनाथ पाणी वापर संस्था क्र.३७. व को.पो.बंधारे वडनेर ३,५४,०००( तीन लक्ष चौपन्न हजार) व जांबुत शाखेतील संत ज्ञानेश्वर पाणी वापर संस्था क्र.३१. व को. पो.बंधारे शरदवाडी/जांबुत



३,७०,०००(तीन लक्ष सत्तर हजार ) पाटबंधारे विभाग खात्यावरती एक रक्कमी भरल्याने शिरूर तालुक्यासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

कुकडी प्रकल्पाच्या पाण्यावर शेती करणाऱ्या अनेक भागात पाणीपट्टी भरण्याबाबत उदासीनता दिसून येत असताना वडनेर व सरदवाडी जांबुत ग्रामस्थांनी दाखवलेल्या या एकजुटीमुळे परिसरात त्यांचे विशेष कौतुक होत आहे अशी माहिती मीना शाखा कालवा अध्यक्ष व घोड/ कुकडी प्रकल्प कालवा सल्लागार समिती सदस्य प्रकाश वायसे यांनी दिली आहे.

घोड/कुकडी प्रकल्पाचे पाणी वापरताना अनेकता पाणीपट्टी थकल्यामुळे ऐनवेळी पाणी सोडण्याबाबत तांत्रिक अडचणी निर्माण होतात ज्याचा फटका थेट पिकांना बसतो ही समस्या ओळखून वारंवार शेतकऱ्यांमध्ये पाणी व पाणी वापर संस्था याबाबत जागरूकता निर्माण करण्याचे काम श्रीकृष्ण पाणी वापर संस्थेचे चेअरमन सुभाष झिंजाड हे करत असतात.

माजी आमदार पोपटराव गावडे व भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीप वळसे पुणे जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र गावडे , सरपंच दामू घोडे यांनी वेळोवेळी शेतकऱ्यांना पाणीपट्टी भरण्याचे आव्हान केले होते.

या उपक्रमाची दखल घेत कार्यकारी अभियंता गणेश नान्नोर, उपअभियंता कुकडी पाटबंधारे उपविभाग क्र.२. नारायणगाव सचिन शिंदे, टाकळी हाजी शाखा अधिकारी व्ही.पी. पाटील, जांबुत/ शिरोली शाखा अधिकारी ए .एल. कुमावत यांनी पाणी वापर संस्था व शेतकरी यांचे अभिनंदन केले आहे.

# दौंडमध्ये भव्य 'फुले-शाहू-आंबेडकर मोफत आरोग्य शिबिरा'चे आयोजन

## नामवंत डॉक्टरांकडून होणार मोफत तपासणी व उपचार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पाटस :** दौंड शहरात येत्या शनिवारी, ११ एप्रिल २०२६ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांच्या संयुक्त जयंती उत्सवानिमित्त भव्य 'मोफत आरोग्य शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आणि डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, यामध्ये गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि मोफत औषधे उपलब्ध करून दिली जाणार आहेत.

हे शिबिर शनिवारी सकाळी १० वा. दौंड पोलीस स्टेशन जवळील संविधान स्तंभ येथे संपन्न होईल. या शिबिराचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष विरधवल जगदाळे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दौंड तालुक्याचे माजी आमदार रमेश (आप्पा) थोरात हे भूषविणार आहेत.

याप्रसंगी दौंड नगरपालिकेच्या नगराध्यक्षा दुगदिवी इंद्रजित जगदाळे, उपनगराध्यक्षा छाया दीपक थोरात यांच्यासह महसूल आणि पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित



राहणार आहेत.

या आरोग्य शिबिरात सामान्य नागरिकांसाठी विविध महत्त्वाच्या तपासण्या मोफत केल्या जाणार आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शुगर (मधुमेह) आणि बी.पी. तपासणी, ईसीजी आणि हृदय तपासणी, किडनी तपासणी आणि रक्त तपासणी, डोळे, मोतीबिंदू तपासणी आणि चष्म्याचे नंबर तपासणी, मोफत औषधोपचार आणि शस्त्रक्रिया असणार आहे. शिबिरामध्ये केवळ तपासणीच नव्हे, तर रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि १५ दिवसांची शुगर व बी.पी. ची औषधे, मोफत चष्मे वाटप (नंबरनुसार), कॅल्शिअम, मल्टी-व्हिटॅमिन, हृदय रोग आणि हाडांच्या दुखण्यावरील औषधे, महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना आणि मुख्यमंत्री सहायता निधी अंतर्गत मोफत उपचार व आवश्यक असल्यास शस्त्रक्रियेचे मार्गदर्शन या सुविधाही मोफत मिळतील.

या शिबिरामध्ये खवटे हॉस्पिटल, सोनोने हॉस्पिटल, पिरामिड हॉस्पिटल, पुष्पलक्ष्मी हॉस्पिटल, श्रद्धा हॉस्पिटल आणि विघ्नहर्ता हॉस्पिटलमधील नामांकित डॉक्टर आपली सेवा प्रदान करणार आहेत. या भव्य उपक्रमाचे नियोजन श्रेयश दिनकर सोनवणे, विकास शेलार, अतिश राजाभाऊ जंगले, अशोक चव्हाण (अध्यक्ष, डीपीआय दौंड तालुका) आणि आकाश लोखंडे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी केले आहे. परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# सडे येथे भरदिवसा घरफोडी; लाखोंचे सोन्याचे दागिने लंपास

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** अज्ञात आरोपींनी भर दिवसा राहुरी तालुक्यातील सडे येथील सदाशिव गवते यांच्या घरात घुसून डब्यात असलेले लाखों रुपए किंमतीचे सोन्याचे दागीने चोरुन नेल्याची घटना घडली.

सदाशिव मारुती गवते, वय ५५ वर्षे, रा. सडे, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, सदाशिव गवते व त्यांच्या घरातील इतर लोक दि. २ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजेच्या सुमारास सडे येथील मारुती मंदिरामध्ये कार्यक्रमा करीता गेले होते. कार्यक्रम संपल्या नंतर ते शेतात कामाला गेले. त्यानंतर ते दुपारी २.३० वाजेच्या सुमारास घरी परत आले. या दरम्यान भामट्यांनी सदाशिव गवते यांच्या घरात घुसून घरातील एका डब्यात ठेवलेले ३ तोळे ३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने घेऊन चोरटे पसार झाले. सदाशिव गवते यांनी दागीण्यांचा घरात इतरत्र शोध घेतला परंतु ते मिळुन आले नाही. कोणीतरी अज्ञात भामट्याने सोन्याचे दागिने चोरून नेल्याची खात्री झाल्या नंतर सदाशिव मारुती गवते यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. त्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा रजि. नं. ३१७/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे. मात्र भर दिवसा झालेल्या या चोरीच्या घटनेमुळे सडे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## संक्षीप्त वृत्त

### हाईब इंडिया ऑडिशन्सचे मे महिन्यात पुण्यात आयोजन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** हाईब इंडिया तर्फे आज त्यांच्या ऑडिशन्सच्या पुढील टप्प्याची घोषणा केली आहे, यामध्ये इन–पर्सन ऑडिशन टूरची माहिती तसेच उदयोन्मुख प्रतिभेला प्रोत्साहन देण्यासाठी विविध पॉप–अप उपक्रमांचा समावेश आहे. ही ऑडिशन टूर मे ते जुलै २०२६ दरम्यान होणार असून भारत आणि जगभरातील १५ शहरांमध्ये आयोजित केली जाणार आहे. या टूरची सुरुवात ३ मे रोजी गुवाहाटी येथून होईल. त्यानंतर मुंबई (१० मे), पुणे (१७ मे), हैदराबाद (२४ मे) आणि बेंगळुरू (३१ मे) येथे ऑडिशन्स घेतल्या जातील. या टूरमध्ये आंतरराष्ट्रीय शहरांचा सुध्दा समावेश असेल, ज्यामध्ये टोरोंटो (२३–२४ मे), न्यूयॉर्क (३० मे), सिंगापूर (१३ जून), सिडनी (२० जून) आणि लंडन (४–५ जुलै)यांचा समावेश आहे. त्यानंतर दिल्ली (१४ जून), चेन्नई (२७ जून), अहमदाबाद (११ जुलै), कोलकाता (१८ जुलै) आणि चंदीगड (२५ जुलै) या भारतीय शहरांमध्ये ही टूर सुरू राहील. या इन पर्सन ऑडिशन चे मुल्यांकन प्रतिथयश अशा हाईडच्या ग्लोबल टॅलेंट डेव्लमेंट एक्सपट्र्स कडून केले जाणार असून हे मंडळ जगभरांतील संगीत क्षेत्रातील कलाकारांची निवड आणि विकास करण्यात आघाडीवर आहेत.

### मयताच्या नातेवाईकांचा शोध सुरू

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** कोतवाली पोलीस स्टेशन हद्दीत एका अज्ञात पुरुषाच्या मृत्यूची नोंद करण्यात आली असून संबंधित मयताच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. याबाबत पोलीस नाईक व्ही. डी. गाजरे (बकल नं. ६६७), कोतवाली पोलीस स्टेशन, अहिल्यानगर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी अहिल्यानगर येथील ट्रान्सपोर्ट ऑफिससमोर एक अज्ञात पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला होता. त्यावेळी १०८ रुग्णवाहिकेच्या सहाय्याने संबंधित व्यक्तीस उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णावर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला. सदर प्रकरणी अकस्मात मृत्यू नोंद (आ.मू. रजिस्टर नं. २८/२०१६) करण्यात आलेली आहे. मयताचे नाव व पत्ता अद्याप निष्पन्न झालेला नसून तो अंदाजे मध्यमवयीन पुरुष असल्याचे समजते.

### १० मार्चपासून महिला बेपत्ता; तोफखाना पोलिसांकडून शोध सुरू

■ जनप्रवास प्रतिनिधी



**अहिल्यानगर :** शहरातील भुतकरवाडी परिसरातील रखमाबाई दत्तात्रय हजारे या १० मार्च २०२६ रोजी सायंकाळी घरातून बाहेर पडून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात मिसिंग रजिस्टर क्र. ४३/२०२६ नोंदवून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रखमाबाई या सायंकाळी सुमारे ६ वाजता कोणालाही न सांगता घरातून निघून गेल्या आणि त्यानंतर परतल्या नाहीत. नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतल्यानंतर १३ मार्च रोजी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली. हरवलेल्या महिलेची उंची सुमारे ४ फूट ६ इंच, सडपातळ बांधा, गोरा–काळसर वर्ण, उभट चेहरा आणि पिवळसर केस अशी ओळख आहे. अंगात निळ्या रंगाचा गाऊन, पिवळा स्वेटर असून दोन्ही हातांवर गोंदलेले आहे. या महिलेबाबत कोणाला काही माहिती मिळाल्यास तोफखाना पोलीस ठाणे किंवा तपासी अधिकाऱ्यांशी तात्काळ संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

### पुणे आरटीओकडून २०२५–२६ मध्ये महसूल १९२२.१२ कोटी रुपये वसूल; उद्दिष्टापेक्षा जास्त १०१.४२ टक्के कामगिरी

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे मार्फत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात महसूल वसूली, अंमलबजावणी व अनुषंगिक कामकाजाबाबत उल्लेखनीय कामगिरी करण्यात आली आहे. शासनाने निर्धारित केलेल्या १८९५.१७ कोटी रुपयांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत कार्यालयाने १९२२.१२ कोटी रुपये महसूल वसूल करत १०१.४२ टक्के उद्दिष्टपूर्ती साध्य केली आहे.

रस्ता सुरक्षा अंमलबजावणी अंतर्गत तपासणीत दोषी आढळलेल्या ६१ हजार ५०९ वाहनांवर ई–तपासणी कारवाई करण्यात आली असून, त्यातून २५.६८ कोटी रुपयांचा महसूल प्राप्त झाला आहे. तसेच १ लाख ८६ हजार ८२४ वाहन चालक अनुज्ञप्ती व ५ हजार ५८४ आंतरराष्ट्रीय वाहन परवाने जारी करण्यात आले आहेत. थकीत मोटार वाहन करापोटी ३२.२३ कोटी रुपये व पर्यावरण करापोटी ९.८० कोटी रुपये महसूल वसूल करण्यात आला आहे. ई–लिलावाडरे १९३ वाहनांच्या विक्रीतून १.०६ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ११ लाख १८ हजार ८४४ वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यात आल्या असून, ३ लाख ४५ हजार ५४३ नवीन वाहनांची नोंदणी करण्यात आली आहे. तसेच ५६ हजार १७२ पसंती क्रमांक आरक्षित करून त्यातून ७३.७६ कोटी रुपयांचा महसूल मिळविण्यात आलाअसल्याची माहिती प्रादेशिक परिहवन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी दिली आहे.

### जंगली प्राण्यांचे हल्ले आणि वाढती गुन्हेगारी; १४ एप्रिलपासून उपोषणाचा इशारा

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** जिल्ह्यात वाढत्या जंगली प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे तसेच वाढत्या गुन्हेगारी व अवैध धंद्यांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना तीव्र झाली आहे. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते दादासाहेब कुशाबापू पवार यांनी शासनाकडे वारंवार निवेदने देऊनही ठोस कारवाई होत नसल्याने १४ एप्रिल २०२६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीपासून उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे. जंगली प्राण्यांच्या हल्ल्यांमुळे ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व लहान मुलांचे जीवित धोक्यात आले असून रानडुक्करांमुळे पिकांचे मोठे नुकसान होत आहे. या समस्येवर उपाय म्हणून संवेदनशील भागात विशेष पथके नेमणे, शेतकऱ्यांना तार कुंपणासाठी १०० टक्के अनुदान देणे आणि हल्ल्यातील बळी व जखमींना तात्काळ मदत देण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच जिल्ह्यात अवैध दारू विक्री, मटका, जुगार, महिलांवरील अत्याचार, चोरी व दरोडे यांसारख्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. यावर नियंत्रण मिळवण्यासाठी दोषी अधिकारी व संबंधितांवर कठोर कारवाई करावी, तसेच पोलीस दल वाढवून विशेष पथके स्थापन करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# आकारी पडीत जमिनी परत मिळवण्यासाठी ११ एप्रिलला 'जेल भरो' आंदोलन

■ जनप्रवास वार्ताहार

**माळवाडगांव :** शेती महामंडळाच्या हरिगांव मळा ९ गावातील आकारी पडीत शेतकऱ्यांचे आपल्या हक्काच्या वडिलोपार्जित जमिनी सरकारने त्वरित परत कराव्यात या मागणीसाठी शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष अँड अजित काळे यांचे मार्गदर्शनाखाली शनिवार, ११ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्रीरामपूर येथे शहर पोलिस स्टेशन मध्ये भव्य जेल भरो आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

शेती महामंडळाच्या हरिगांव मळा परिसरातील शिरसगाव, ब्राम्हणगांव, वडाळा महादेव, ऊंदिरगांव, खैरी, निमगांव,माळवाडगांव मुठेवाडगांव , खानापूर या नऊ गावातील शेतकऱ्यांच्या वडीलोपार्जित जमिनी १९१८ साली ब्रिटिश सरकारने भंडारदरा धरणाच्या पाणलोट क्षेत्रात विकसित करून पिकविणाऱ्यासाठी ३० वर्षांच्या कराराने परत करण्याचे अँग्रीमेंट केले होते.पुढे १९४८ च्या स्वातंत्र्यानंतर राज्य सरकारने या जमिनीवर शेती महामंडळ स्थापन करून खंडकरी शेतकऱ्यांचे जमिनी समाविष्ट केल्या.या खंडकरी शेतकऱ्यांचे जमिनी राज्य सरकारने परत केल्या मात्र आकारी पडीक जमिनी अद्याप ताब्यात ठेवल्या आहेत. या जमिनीचे मुळ शेतकऱ्यांचे वारस मालक आहेत.



सरकारने अधिग्रहित केलेल्या नाहीत हे उच्च न्यायालयात सिद्ध झाले आहे.छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयाने आठ आठवड्यांत जमिनी परत देण्याचे आदेश १४ आगष्ट २०२५ च्या निकालात राज्य सरकारला दिले.

ना.एकनाथ शिंदे मंत्रिमंडळातील त्यावेळचे महसूल मंत्री व अहिल्यानगरचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या जमिनी परत मिळवून देण्यासाठी ना.विखेपाटील हे आकारी पडीत शेतकऱ्यांचे बाजूने असल्याने हा लढा आतापर्यंत यशस्वी झाला असल्याचे आकारी पडीत चळवळीचे मार्गदर्शक अँड अजित काळे हे देखील वेळोवेळी आपल्या भाषणातून व्यक्त करत असतात.

मात्र नव्याने अस्तित्वात आलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सरकारने राज्यपाल महोदय प्रस्तावावर स्वाक्षरी करत नाही या सबबीखाली हा प्रश्न प्रलंबीत ठेवला आहे.निव्वळ हा प्रश्न प्रलंबीत च ठेवला नाही तर या जमिनी मोठ्या उद्योग व्यवसायास देण्याचा घाट घातला आहे.

आता सरकारला जाग आणण्यासाठी हा लढा शांततेच्या मार्गाने रस्त्यावरची लढाई लढुन अँड अजित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढे नेण्याचा निर्णय ९ गावातील आकारी पडीत शेतकऱ्यांनी घेतला आहे. हे आंदोलन यशस्वी होण्यासाठी कार्यकर्ते ९ गावात जाऊन बैठका घेऊन जनजागृती करत आहे.या आंदोलनासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन ९ गांवे आकारणी पडीत कृती समितीचे वतीने करण्यात आले आहे.

## 'छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार २०२६'साठी पुस्तकांचे आवाहन

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर** जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या श्री शिवाजी मध्यवर्ती सहकारी ग्राहक भांडाराच्या वतीने 'छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार २०२६' साठी पुस्तके व ग्रंथ मागविण्यात आले आहेत. राज्यस्तरीय या प्रतिष्ठित साहित्य पुरस्कारासाठी लेखक आणि प्रकाशकांनी आपल्या साहित्यकृती पाठवाव्यात, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे आणि सचिव ॲड. विश्वासराव आठरे पाटील यांनी केले आहे.



या पुरस्कारासाठी ऐतिहासिक ग्रंथ, कथा संग्रह, कविता, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, कृषी, बालसाहित्य, प्रवासवर्णन, संशोधन, समीक्षा, अनुवादित आणि शैक्षणिक साहित्य अशा सर्व प्रकारच्या साहित्यकृती पात्र राहणार आहेत. संबंधित पुस्तक १ जानेवारी २०२५ ते ३१ डिसेंबर २०२५ दरम्यान प्रकाशित झालेले असावे.

लेखक आणि प्रकाशकांनी पुस्तकाच्या दोन प्रती, अल्पपरिचय आणि पासपोर्ट साईज फोटोसह ३० एप्रिल २०२६ पर्यंत पाठवायच्या आहेत. यंदा उत्कृष्ट प्रकाशक पुरस्कारही देण्यात येणार आहे.

निवड झालेल्या साहित्यकृतींना मानचिन्ह, सन्मानपत्र, महावस्त्र, रोख रक्कम आणि ग्रंथ देऊन गौरविण्यात येणार आहे. पुस्तके कार्यकारी समन्वयक प्रा. गणेश भगत, छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्य साहित्य पुरस्कार समिती, लालटाकी रोड, अहिल्यानगर – ४१४००१ या पत्त्यावर कुरिअर किंवा स्पीड पोस्टाने पाठवावीत.

## प्रज्ञाशोध परिक्षेत हिंदसेवाचा चिन्मय म्हस्के जिल्ह्यात दुसरा

### डॉ. हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठान आयोजित प्रज्ञाशोध परिक्षेत हिंदसेवाचे सात विद्यार्थी चमकले

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** हिंद सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, बागडपट्टी विभागाचे इयत्ता चौथीतील ७ विदयार्थी डॉ. हेगडेवार शिक्षण प्रतिष्ठाण आयोजित अहिल्यानगर प्रज्ञाशोध परिक्षेत जिल्हास्तर गुणवत्ता यादीत चमकले. शाळेतील इयत्ता चौथी मधील चिन्मय म्हस्के हा २८० गुण मिळवत जिल्हयात दुसरा आला.त्याचप्रमाणे अर्णवी कांबळे –जिल्हयात आठवी,अदिती खेडकर–



जिल्हयात नववी, राजकुमार निसाद–जिल्हयात दहावा, जिविका ताकपेरे–जिल्हयात चौदावी, असद शेख–जिल्हयात सतरावा व सीमरा शेख–जिल्हयात सतरावी आली.

दरवर्षी स्पर्धा परीक्षेसाठी शाळेतील विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली जाते.यासाठी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे तसेच सर्व शिक्षक परिश्रम घेत असतात.विद्यार्थ्यांनी प्राथमिक शाळेपासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करुन भविष्यात उज्वल या संपादन करावे. या सर्व विदयार्थांना शाळेतील शिक्षिका सौ.मनिषा साळी व मुदस्सिर पठाण यांनी मार्गदर्शन केले.

## भविष्य सांगण्याच्या बहाण्याने वृद्धांची फसवणूक; दोघे अटकेत

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर शहरात वृद्ध नागरिकांना लक्ष्य करून भविष्य सांगण्याच्या बहाण्याने सोन्याच्या अंगठ्या लंपास करणाऱ्या दोन आरोपींना कोतवाली पोलिसांनी अटक केली आहे. आरोपींकडून सुमारे १.२० लाख रुपये किमतीच्या दोन सोन्याच्या अंगठ्या जप्त करण्यात आल्या.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संतोष चंद्रसेन गायकवाड (६८, समतानगर, केडगाव) हे २८ मार्च रोजी केडगाव वेस येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ बसले असताना दोन अनोळखी इसमांनी त्यांच्याशी संवाद साधला.

भविष्य सांगण्याच्या बहाण्याने त्यांनी हातातील सोन्याची अंगठी काढून ती २० रुपयांच्या नोटेत गुंडाळून खिशात ठेवली असल्याचा बनाव केला; मात्र प्रत्यक्षात




अंगठी स्वत:जवळ ठेवून फसवणूक केली.


अशाच प्रकारे सावेडीतील ७४ वर्षीय अरुण निंबाळकर यांचीही पुणे एसटी स्टँडवर बसची वाट पाहत असताना फसवणूक करण्यात आली. आरोपींनी त्यांची अंगठी पिशवीत ठेवली असल्याचे भासवून ती चोरून नेली.

दोन्ही तक्रारींनंतर कोतवाली पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा शोध घेत त्यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आरोपींकडून ७ ग्रॅम आणि ५ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या जप्त करण्यात आल्या आहेत.

## राहुरीच्या वंचित बहुजन आघाडीच्या मेळाव्यासाठी प्रकाश आंबेडकर यांची उपस्थिती

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहुरी :** राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष चोळके यांच्या प्रचारासाठी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. झअॅरझ्रिह आलशवज्ञरअॅ हे गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६ रोजी राहुरी येथे येणार आहेत. हॉटेल आत्मा मालिक हॉल येथे आयोजित पदाधिकारी व कार्यकर्ता मेळाव्यात ते मार्गदर्शन करणार आहेत.



याबाबत माहिती देताना वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मधुकर साळवे यांनी सांगितले की, सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्ता असलेल्या संतोष चोळके यांना उमेदवारी देऊन पक्षाने प्रस्थापित घराणेशाहीला थेट आव्हान दिले आहे. ही निवडणूक कष्टकरी शेतकरी आणि उपेक्षित घटकांच्या अस्तित्वाची लढाई असल्याचे त्यांनी नमूद केले. तालुकाध्यक्ष बाळासाहेब जाधव यांनी भाजपवर टीका करत धर्माच्या नावावर राजकारण होत असल्याचा आरोप केला. सध्या भाजपविरोधात वातावरण तयार झाले असून, ही निवडणूक वंचित बहुजन आघाडी आणि भाजप यांच्यातच होणार असल्याचा दावा त्यांनी केला. उमेदवार संतोष चोळके यांनी आपल्या भाषणात छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर आधारित हिंदुत्वाची भूमिका मांडली. तसेच बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाच्या मूल्यांवर आणि ज्योतिराव फुले यांच्या विचारांवर चालणारे शासन हवे असल्याचे त्यांनी सांगितले. धर्माच्या नावावर राजकारण करणाऱ्यांना या निवडणुकीत धडा शिकवण्याचे आवाहन करत ही लढाई 'धनशक्ती विरुद्ध जनशक्ती' असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या वेळी झालेल्या पत्रकार परिषदेस ज्येष्ठ नेते शिरीषराव गायकवाड, बाबासाहेब साठे, संदीप कोकाटे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## प्रवासात महिलेचे साडेबारा लाखांचे दागिने चोरी; कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** पुणे ते पाथर्डी प्रवासादरम्यान एसटी बसमधील गर्दीचा फायदा घेत अज्ञात महिला चोरट्याने वृद्ध महिलेच्या बॅगेतील सुमारे १२ लाख ८५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिनाबाई बडाख या पुणे ते अहिल्यानगर असा एसटी बसने प्रवास करत होत्या. प्रवासादरम्यान त्यांनी आपले सोन्याचे दागिने बॅगेत ठेवले होते. मात्र सकाळी १०:३० ते दुपारी २ वाजण्याच्या सुमारास बसमधील गर्दीचा फायदा घेत अज्ञात महिलेने त्यांच्या बॅगेतील दागिने चोरून नेले.

चोरीस गेलेल्या ऐवजात अडीच तोळ्यांच्या बांगड्या, चार तोळ्यांचे दोन मोठे गंठण, मिनी गंठण, कानातील झुबे, टॉप्स, सोन्याच्या सहा अंगठ्या आणि चैन असा एकूण १८ तोळ्यांहून अधिकचा ऐवज समाविष्ट आहे.

घटना लक्षात येताच फिर्यादीने कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०३(२) नुसार गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथक अधिक तपास करत असून, बसमधील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संशयितांचा शोध सुरू आहे.

दरम्यान, प्रवाशांनी प्रवासादरम्यान आपल्या मौल्यवान वस्तूंची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहाचा शुभारंभ

### पुणे विभागात विविध कार्यक्रमाचे आयोजन; अधिकाधिक नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा : प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्यावतीने ८ एप्रिल ते १४ एप्रिल २०२६ या कालावधीत 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताहानिमित्त पुणे विभागातील पुणे, सातारा,सोलापूर, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, या कार्यक्रमाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांनी केले आहे.

प्रादेशिक कार्यालयात प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सप्ताहाचा शुभारंभ झाला. यावेळी सहायक संचालक (वित्त व लेखा) अनिल गिते , सहायक आयुक्त विशाल लोंढे, माधुरी वाघमोडे, ज्ञानेश्वर जावळे, समाज कल्याण अधिकारी उपस्थित होते. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत सप्ताहाची माहिती देण्यासोबतच भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे वाटप करण्यात आले.

या सप्ताहाच्या माध्यमातून सामाजिक समता, महापुरुषांचे विचार आणि शासकीय योजना तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत. या सप्ताहाच्या नियोजनाबाबत पुणे विभागातील जिल्हा स्तरावर शहरी व ग्रामिण भागात सहाय्यक



आयुक्त समाज कल्याण पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, व कोल्हापूर या कार्यालयाने आपापल्या कार्यक्षेत्रात जय्यत तयारी केली असून, या सात दिवसांत खालीलप्रमाणे विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिनांक ९ एप्रिल रोजी युवा संवाद कार्यक्रमाअंतर्गत महाविद्यालये व शासकीय वसतिगृहांमध्ये महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष, संत गाडगे महाराज यांची १५० वी जयंती आणि आंबेडकरी विचार या विषयांवर व्याख्याने व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १० एप्रिल रोजी योजना प्रबोधन कार्यक्रमाअंतर्गत समता दूतांमार्फत पथनाट्ये व लघुनाटिका सादर करून शासकीय योजनांचे प्रबोधन करण्यात येणार आहे. तसेच 'मार्जिन मनी' योजनेच्या लाभार्थ्यांसाठी विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक ११ एप्रिल रोजी महात्मा फुले जयंतीनिमित्त महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त त्यांच्या सामाजिक कार्यावर आधारित विविध गौरवपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. दिनांक १२ एप्रिल रोजी संविधान जागर व महिला मेळाव्याअंतर्गत संविधानातील मूलभूत अधिकार व कर्तव्यांवर व्याख्याने आयोजित केली असून, महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष महिला मेळावा घेण्यात येणार आहे. दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी सामाजिक बांधिलकी उपक्रमाअंतर्गत ज्येष्ठ नागरिक मेळावा, रक्तदान शिबीर आणि स्वच्छता अभियानाडरे सामाजिक सेवेचे व्रत जोपासले जाईल. तसेच कोल्हापूर औद्योगिक संस्था मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित केली जाईल दिनांक १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून जयंती साजरी केली जाणार असून व्याख्याने आणि चर्चासत्रांनंतर या सामाजिक समता सप्ताहाचा समारोप होणार आहे.

# मेलेल्या बकऱ्याचे मटण विक्रीचा धक्कादायक प्रकार; विक्रेत्यावर गुन्हा

## राहाता बाजारतळ मटण मार्केटमध्ये संतापाची लाट

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** शहरात रविवारी घडलेली एक संतापजनक घटना केवळ ग्राहकांच्या विश्वासाला धक्का देणारी नाही, तर समाजाच्या संवेदनशीलतेलाही हादरवून टाकणारी ठरली आहे. शहरातील बाजारतळ परिसरातील मटण मार्केटमध्ये घडलेल्या या प्रकाराने नफा की नैतिकता? हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे.

गोकुळ मोगले यांनी ८०० रुपये किलो दराने बोकडाचे मटण खरेदी केले. मात्र घरी शिजवल्यानंतर त्यातून येणाऱ्या तीव्र दुर्गंधीमुळे संशय निर्माण झाला. चौकशी केल्यानंतर जे सत्य समोर आले, ते अधिकच धक्कादायक होते सदर मटण हे जिवंत प्राण्याचे नसून मेलेल्या बकऱ्याचे असल्याचे उघड झाले. केवळ १५० रुपयांत खरेदी केलेला मृत प्राणी ग्राहकांना तब्बल ८०० रुपये किलो दराने विकला जात असल्याचे समोर आले.

ही घटना समोर येताच शहरात संतापाची लाट उसळली. माजी नगराध्यक्ष कैलास सदाफळ यांनी घटनास्थळी भेट देत संबंधित विक्रेत्याला तीव्र शब्दांत जाब विचारला. अशा प्रकारांना राहात्यात स्थान नाही, अन्यथा कठोर पावले उचलावी लागतील, राहात्याचा श्रीरामपूर करायला असा इशारा त्यांनी दिला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पालिका प्रशासन, नगराध्यक्ष, नगरसेवक आणि समाजातील प्रमुख व्यक्तींनी तातडीची बैठक घेतली. सर्वानुमते संबंधित खाटकावर एक महिन्याची दुकानबंदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. विशेष म्हणजे, मुस्लिम समाजासह खाटीक समाजातील अनेकांनीही या प्रकाराचा निषेध करत निर्णयाला पाठिंबा दर्शवला. दरम्यान, संबंधित विक्रेत्याविरोधात राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र या घटनेने एक गंभीर सामाजिक प्रश्नही पुढे आणला आहे. एका व्यक्तीच्या गैरकृत्यामुळे संपूर्ण समाजाला दोष देणे कितपत योग्य आहे? चुकीला शिक्षा झालीच पाहिजे, परंतु चोर



सोडून संन्याशाला फाशी देण्याची मानसिकता समाजासाठी अधिक धोकादायक ठरू शकते. याशिवाय, मटण मार्केटमध्ये एका कुटुंबातील अनेक दुकाने असल्याचा मुद्दाही चर्चेत आहे. मात्र 'वोटबँक'च्या राजकारणामुळे यावर कोणी उघडपणे बोलण्यास तयार नसल्याची कुजबुज नागरिकांमध्ये ऐकू येत आहे. ही घटना केवळ अन्नसुरक्षेचा प्रश्न नाही, तर प्रशासनाच्या देखरेखीचा, व्यापाऱ्यांच्या नैतिकतेचा आणि समाजाच्या समतोल दृष्टिकोनाचा कस लावणारी आहे. आता गरज आहे ती कठोर कारवाईसोबतच निष्पक्ष दृष्टीकोनाची जेणेकरून विश्वास टिकेल आणि माणुसकीही जपली जाईल.

# सायली सुर्वेचा छळ करणाऱ्यांना तातडीने अटक करा

## प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांची मागणी; पीडित महिलांसाठी 'ऑपरेशन दुर्गा' अभियान

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पुणे :** ''सायली सुर्वे हिची सुखरूप घरवापसी करण्यात यश आले असून, ती सुरक्षित घरी पोहोचली आहे. मात्र, सध्या ती प्रचंड तणावाखाली असून, तिचा आतोनात छळ झाला आहे. अटकपूर्व जामिनासाठी नाहरकत पत्र घेण्यासाठी सायलीला जबरदस्तीने नेण्यात आले होते. तेथे तिच्यावर मानसिक व शारीरिक दबाव टाकण्यात आला. सायलीचे शोषण करणाऱ्या पती आतिफ व सासू गुलशन तासे यांना तातडीने अटक करावी,'' अशी मागणी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत केली. लव्ह जिहादसारख्या घटनांनी पीडित महिलांच्या साहाय्यासाठी 'ऑपरेशन दुर्गा' अभियान सुरु करत असल्याची माहितीही त्यांनी दिली.



प्रा. डॉ. मेधा कुलकर्णी म्हणाल्या, ''सायलीला जबरदस्तीने सोबत नेणाऱ्या आतिफ तासे याच्यावर २८ पेक्षा अधिक गुन्हे दाखल असून, तो पोलीस नोंदीमध्ये फरार असल्याचे समोर आले आहे. सायलीने यापूर्वी अनेकवेळा त्याच्याविरोधात तक्रारी दिल्या होत्या. तरीही तिला पोलीस संरक्षण का देण्यात आले नाही. तिच्या सुरक्षेची जबाबदारी नेमकी कोणाची होती, याचीही चौकशी व्हायला हवी. सायलीवर सातत्याने दबाव टाकण्यात आल्याने तिची मानसिक अवस्था अत्यंत बिकट झाली होती. तिला पुन्हा जबरदस्तीने घेऊन जाण्यात आले. आतिफ तासे व त्याच्या कुटुंबीयांकडून सायलीचा छळ करण्यात येत आहे. तिच्या आई-वडिलांना, तसेच मामा व इतर नातेवाईकांना धमकवले जात आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने यामध्ये गांभीर्याने लक्ष घालून आरोपीना अटक करायला हवी.

सायलीला घटस्फोट हवा असून, तिला साधेपणाने आयुष्य जगायचे आहे. आपल्या मुलांना वाढवायचे आहे. त्यामुळे तिला घटस्फोट मिळवून देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी तत्काळ कार्यवाही करावी, अशी मागणीही त्यांनी केली. स्थानिक पोलिसांच्या त्रुटींबाबतची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्याचेही त्या म्हणाल्या. तसेच फडणवीस यांनी यामध्ये लक्ष घालून सायलीचे सुखरूप सुटका करण्यासाठी यंत्रणांना सूचना दिल्या. त्याबद्दल कुलकर्णी यांनी फडणवीसांचे आभार मानले. सायलीसोबत आम्ही ठामपणे उभे आहोत, तिला घाबरण्याचे कारण नाही, असा विश्वासही यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच, अशा घटनांतील मुलींना तात्काळ पोलीस मदत मिळावी, हीच अपेक्षा असल्याचे सांगण्यात आले. तिच्यावर मोठे मानसिक दडपण असून, चार मुलांना आणि तिच्या आईवडिलांना देखील धोका आहे. ज्यावेळी महिला पोलिसांकडे तक्रार करतील त्यावेळी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला पाहिजे. सासू गुलशन हिच्यावर अनेक गुन्हे दाखल असून, तिच्या चार सुना हिंदू आहे. त्यातील काहीजणांनी सासू विरोधात तक्रार देखील दिली आहे. हा लव्ह जिहाद प्रकार आहे. पोलीस ठाण्यात भरोसा सेल प्रमाणे स्वतंत्र लव्ह जिहाद सेल निर्माण केला पाहिजे. महाराष्ट्र सरकारने निर्णय घेतला की, बळजबरीने धर्म बदल करण्यासाठी कोणावरही दबाव टाकला जाणार नाही, असेही त्यांनी नमूद केले.

अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये महिलांना तातडीने मदत मिळावी यासाठी 'ऑपरेशन दुर्गा' नावाचा विशेष सेल सुरू करण्याची घोषणा करण्यात आली आहे. याअंतर्गत हेल्पलाइन सुरू करण्यात येणार असून, राज्यातील गरजू महिलांना समुपदेशनासह सर्वतोपरी मदत केली जाणार आहे.समुपदेशन आणि पुनर्वसन तसेच पीडित मुलींना मदत या अभियान मधून केली जाणार आहे.

# 'सरकार शितोळे सेतू' नामकरण व सुशोभीकरणामुळे सांगवी-बोपोडी परिसराला नवी ओळख : महापौर रवि लांडगे

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुळा नदीवरील सांगवी-बोपोडी पुलावरील विद्युत रोषणाई व सुशोभीकरण या कामाचे लोकार्पण व नामकरण**

■ जनप्रवास प्रतिनिधी

**पिंपरी :** मुळा नदीवरील सांगवी-बोपोडी दरम्यान असलेल्या विद्यमान पुलाचे 'सरकार शितोळे सेतू' असे नामकरण करण्यात आले असून, पुलावर करण्यात आलेल्या विद्युत रोषणाई व सुशोभीकरणामुळे या परिसराच्या सौंदर्यात लक्षणीय भर पडली आहे. या उपक्रमामुळे नागरिकांना अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि आकर्षक वातावरणात प्रवासाचा अनुभव मिळणार असून, शहराच्या विकासाला नवा आयाम प्राप्त होणार आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने मुळा नदीवरील सांगवी-बोपोडी पुलावरील विद्युत रोषणाई व सुशोभीकरण या कामाचे लोकार्पण तसेच पुलाचे 'सरकार शितोळे सेतू' असे नामकरण महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते.

उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्य नवनाथ जगताप,हर्षल ढोरे,राजू बनसोडे, प्रभाकर वाघेरे, नगरसदस्या दिप्ती कांबळे, उज्ज्वला ढोरे,पल्लवी जगताप, शकुंतला धराडे, सुषमा तनपुरे, माजी नगरसदस्य संतोष कांबळे यांच्यासह महापालिका अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, विक्रांत बगाडे, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता प्रेरणा सिनकर, कार्यकारी अभियंता संध्या वाघ, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.तसेच सरकार शितोळे यांच्या कुटुंबातील निलीमा नितीन शितोळे,नेहा शितोळे पवार,नकुल शितोळे,शिवराज शितोळे आदी उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, 'विद्यमान पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावणे आणि त्यांना आधुनिक रूप देणे हे महापालिकेचे धोरण आहे. 'सरकार शितोळे सेतू'च्या सुशोभीकरणामुळे केवळ पुलाचा दर्जाच उंचावला नाही, तर शहराच्या सौंदर्यवृद्धीलाही चालना मिळाली आहे. अशा उपक्रमांमुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडून येत असून, भविष्यातही अशा प्रकल्पांवर भर दिला जाईल, असे देखील ते म्हणाले.

# डॉक्टर राजेंद्र पिपाडा यांनी घेतली गृहमंत्री अमित शहा यांची भेट

■ जनप्रवास प्रतिनिधी

**राहाता :** गृहमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे चाणक्य मानले जाणारे अमित शहा यांची भाजपचे ज्येष्ठ नेते डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी दिल्ली येथे सदिच्छा भेट घेतली. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांमध्ये विविध विषयांवर महत्त्वपूर्ण चर्चा झाली असून, राजकीय वर्तुळात या भेटीकडे मोठ्या कुतूहलाने पाहिले जात आहे.



राज्याच्या राजकारणात सक्रिय असणारे डॉ. राजेंद्र पिपाडा यांनी नुकतीच देशाची राजधानी गाठून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. या प्रसंगी डॉ. पिपाडा यांनी अमित शहा यांना बजरंगबलीची मूर्ती भेट देऊन त्यांचा सत्कार केला.

ही भेट केवळ सदिच्छा असली, तरी आगामी काळातील राजकीय घडामोडी आणि संघटनात्मक बांधणीच्या दृष्टीने या चर्चेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

यावेळी डॉ. पिपाडा यांच्या समवेत त्यांच्या कन्या ट्रिकल पिपाडा या देखील उपस्थित होत्या. दिल्लीच्या या दौऱ्यामुळे स्थानिक पातळीवरील कार्यकर्त्यांमध्ये नवा उत्साह संचारला असून, या भेटीचे फोटो सध्या सोशल मीडियावर चांगलेच चर्चेत आहेत.

# माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने पै. नाना डोंगरे यांचा सन्मान

## सामाजिक कार्याची दखल; शिक्षक सोसायटीकडून सत्कार

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते तथा सोसायटीचे सभासद पै. नाना डोंगरे यांचा सन्मान करण्यात आला. जळगाव येथे तुबा नाज हेल्प मल्टीपर्पज सोसायटीच्या वतीने 'पंडित जवाहरलाल नेहरू जीवन गौरव पुरस्कार' मिळाल्याबद्दल हा उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते पै. डोंगरे यांचा सत्कार करण्यात आला.



या सत्कार सोहळ्याप्रसंगी महापौर ज्योतीताई गाडे, चेअरमन आप्पासाहेब शिंदे, व्हाईस चेअरमन अर्जुन वाळके, माजी प्राचार्य खासेराव शितोळे, संचालक बाबासाहेब बोडखे, सुनील दानवे, महेंद्र हिंगे, सुरज घाटविसावे, वैशाली दारकुंडे, वर्षा खिलारी, राजेंद्र कोतकर, उमेश गुंजाळ, सोसायटीचे सचिव स्वप्निल इथापे यांच्यासह चंद्रकांत पवार, निळकंठ वाघमारे अनेक मान्यवर उपस्थित होते.

सामाजिक, शैक्षणिक, साहित्य, सांस्कृतिक आणि पर्यावरण संवर्धन या विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन पै. नाना डोंगरे यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष तसेच ग्रामपंचायत सदस्य म्हणून त्यांनी नगर तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात ग्रामीण भागात सातत्याने सामाजिक उपक्रम राबवले आहेत. संस्थेच्या माध्यमातून त्यांनी शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य आणि धार्मिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, अनेक युवकांना प्रेरणा देणारे कार्य उभारले असल्याचे उपस्थितांनी कौतुक केले.

# शिरूर तालुक्यातील गुनाटमध्ये बिबट्याचा हल्ला

■ जनप्रवास प्रतिनिधी

**निमोणे :** शिरूर तालुक्यातील गुनाट गावातील गुणवंत वाडी येथे बिबट्याने एक बोकड ठार केल्याची धक्कादायक घटना दि. ६ रोजी सायंकाळी सुमारे ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली. येथील शेतकरी हनुमंत गव्हाणे यांच्या घरासमोरील गोठ्यात घुसून बिबट्याने बोकडाचा बळी घेतला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेबाबत माहिती देताना शेतकरी हनुमंत गव्हाणे यांनी सांगितले की, गुणवंतवाडी वस्तीत मागील आठ दिवसांपासून वीजपुरवठा खंडित आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या वादळी वाऱ्यासह गारपीटीमुळे शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्याचवेळी अनेक ठिकाणी वीज खांब कोसळल्याने वीजपुरवठा बंद झाला आहे.






> महावितरणचा गलथान कारभार; आमदारांचेही ऐकत नसतील तर सामान्य शेतकऱ्यांची दखल कोण घेणार?
> – शेतकरी हनुमंत गव्हाणे

नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी आजी-माजी आमदारांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती. त्यावेळी संबंधित महावितरण अधिकाऱ्यांना तातडीने वीजपुरवठा सुरळीत करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र, आठ दिवस उलटूनही अद्याप वीज दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे. वीज नसल्यामुळे पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून जनावरांसाठी चारा व्यवस्थापन करणेही कठीण झाले आहे. त्यातच अंधारामुळे बिबट्यासारख्या वन्य प्राण्यांपासून संरक्षण करणे अवघड बनले आहे. परिणामी, शेतकरी वर्गात भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

आमदारांनी आदेश देऊनही जर काम होत नसेल, तर सर्वसामान्य शेतकऱ्यांचे कोण ऐकणार? असा सवाल उपस्थित करत महावितरणच्या गलथान कारभाराविरोधात शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, प्रशासनाने तात्काळ वीजपुरवठा सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा तसेच वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# भिमसैनिक नितीन शिरसाठ खूनप्रकरणी आरोपींना अटक करा; मोक्का कारवाईची मागणी

## स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीचे पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण

■ जनप्रवास प्रतिनिधी

**अहिल्यानगर :** भिमसैनिक नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खूनप्रकरणातील फरार आरोपींना तात्काळ अटक करून त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करावी, या मागणीसाठी स्वाभिमानी आंबेडकरी चळवळीच्या वतीने जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले.




या उपोषणात रिपब्लिकन पक्ष (गवई) चे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, संपदा म्हस्के, प्रतीक बारसे, विजय शिरसाठ, ज्योती पवार, निलेश शिरसाठ, प्रतीक शिरसाठ, शशिकांत गायकवाड, सोनू जाधव, तात्या शिरसाठ, भावड्या कुऱ्हाडे, विक्रम आंग्रे, राकेश आल्हाट, संतोष लोंढे, प्रवीण गायकवाड, सुजय पाटोळे, विशाल गायकवाड आदींसह अनेक समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

या घटनेतील आरोपींना राजकीय वरदहस्त असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोपही आंदोलनकर्त्यांनी केला आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, आरोपींचे अचूक लोकेशन वारंवार पोलिसांना देऊनही त्यांना अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आरोपींना राजकीय दबावातून वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत, या प्रकरणातील तपासाबाबत पारदर्शकता राखावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, या आरोपींवर यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून, ते सराईत गुन्हेगार असल्याचे पुरावे पोलीस प्रशासनाला सादर करण्यात आले असल्याचे आंदोलकांनी नमूद केले. असे असतानाही दीड महिन्यांहून अधिक काळ लोटूनही अटक न होणे ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाचे तपास अधिकारी यांनी आतापर्यंत नेमका काय तपास केला, किती पथके तयार करण्यात आली, याबाबतची सविस्तर माहिती फिर्यादीला तात्काळ द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. तसेच, या प्रकरणाचा तपास निर्भीड आणि सक्षम अधिकाऱ्याकडे सोपवून आरोपींना लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी करण्यात आलेली आहे.

# दांपत्यात हवी थोडीशी छेडाछेडी



नव्याने जीवनाची सुरुवात करणाऱ्या जोडप्यांना नव्यानेच घर बरे वाटते. मात्र, त्यांना प्रायव्हसी न मिळाल्याने दोघांमध्ये वादाचे प्रसंग उद्‌भवतात. यामुळेच अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. हल्लीच्या एकत्र कुटुंबात एक गोष्ट प्रकर्षाने आढळते. इथे महिलांना घरकामातून वेळच मिळत नसतो आणि त्याचवेळी त्यांचे पती मात्र आपल्या पत्नीने आपली प्रत्येक मागणी पूर्ण करावी, अशी अपेक्षा बाळगत असतात. अशावेळी महिला घरकामाला प्राधान्य देतात. कारण घरकाम टाळून पतीकडे गेल्यास पती खूष होईल पण बोलणी तर तिलाच ऐकावी लागतील. बऱ्याचदा महिलेला प्रथम मुलांना झोपवावे लागते व त्यानंतर पतीजवळ जाण्यास वेळ मिळतो. एकत्र कुटुंबात राहणारे पती-पत्नी सर्वांच्या नजरा चुकवून प्रेमाचे दोन क्षण मिळविण्याची संधी दिवसभर शोधात राहतात. पण वाढत्या जबाबदाऱ्यांसोबतच वेळेअभावी व येणाऱ्याजाणाऱ्यांनी पाहाण्याच्या भीतीपोटी रात्रीचे काही क्षणांचे मिलन यांत्रिक प्रक्रियेतून जास्त राहत नाही व ते कालपरत्वे शिळे होत जाते.

जीवनात ताजेपणा राहण्यासाठी गरज असते. सुखद वैवाहिक जीवनाची. त्यासाठी दांपत्यात हवी थोडीशी छेडाछेडी, प्रेमळ मिठी आणि प्रणयी चेष्टामस्करी. एकत्र कुटुंबात वडीलधाऱ्याचे टोकणे व मुलांचा जास्त चौकसपणा यामुळे त्यांना जास्त दिवस रोमॅंटिक राहता येत नाही.

एकत्र कुटुंबात पती-पत्नीने एकत्र एका ताटात जेवणे वा एकाच कपात चहा पिणे निर्लजपणाचे मानले जाऊ शकते. एकत्र कुटुंबात सुटीच्या दिवशी दुपारी दार बंद करून झोपण्याचा मूड असेल तर वडीलधाऱ्यांचा मान ठेवण्यासाठी तसे करता येत नाही. कधी फिरायला वा बाहेर जेवायला जायचे ठरवले तर सोबत छोट्या नणंदेला वा दिराला घेऊन जावे लागते. याबाबत मानसोपचार तज्ज्ञ म्हणतात की, तसे पाहिले तर प्रेमासाठी दोन क्षणही कमी नाहीत.

प्रत्येक वयात व प्रत्येक क्षणी पती-पत्नींनी प्रेमाचे क्षण टिपायला हवेत. हलक्या - फुलक्या रोमान्सनेच जीवनातील अनेक तणाव व त्रासापासून सहजतेने मुक्ती मिळू शकते. रोमॅण्टिक पती-पत्नी लवकर वृध्दही होत नाहीत व आपल्या मुलांचेही आवडते असतात. त्यामुळे जरी आपण एकत्र कुटुंबात राहात असला तरी तिथेही प्रेमाचे क्षण शोधून त्याचा आनंद घ्यायला हवा.

# सर्वकाही पत्नीला सांगत बसू नका



आई आणि पत्नी यांच्यातील सुवर्णमध्य साधण्याची कला अवगत हवी

सतत आईच्या छत्रछायेत वाढलेल्या मुलाचा विवाह झाल्यानंतर त्याच्या सहचारिणीचे आगमन घरात होते. तोपर्यंत सतत आईचा ध्यास असणाऱ्या मुलाला पत्नीसोबत जुळवून घेत असतानाच घरातील इतरांशी सुवर्णमध्य गाठण्याची कसरत करावी लागते. जराशीही चूक झाल्यास एकीकडे आई, तर दुसरीकडे पत्नी दुखावण्यासाठी पुरेशी असते. यासाठी संतुलन राखण्यास खालील टिप्स उपयुक्त ठरतील. आपण जेव्हा आईबाबत पत्नीसमोर बोलला, तेव्हा आपण काळजी घेणारे, प्रेमळ आणि आदर राखणारे आहात हे दाखवून द्यावे, पण प्रमाणातच.

♦ आपल्या आईविषयीच सतत बोलत राहू नका; अशाने आपण ममाज बॉय (आईच्याच पदराखाली असणारा) ठरविले जाऊ शकता.

♦ आपल्या पत्नीस कधीही ती दुय्यम आहे, असे वाटू देऊ नये. ती महत्वपूर्ण असल्याचे, लहान-सहान गोष्टींमधूनही दाखवून द्या.

♦ अडचणींच्या प्रसंगी दोघींनाही तुम्ही दुसरीस अधिक महत्व देत आहात असे वाटू देऊ नये. पत्नीपेक्षा आईस महत्व दिले किंवा याउलट केले, तरी दोघीही नाराज होणारच. अशाप्रसंगी आपला बचाव व्हावा, यासाठी तुलना करु नका.

♦ याहीपेक्षा, कधीही पत्नीच्या व्यक्तीमत्वाची तुलना आईबरोबर करु नये. त्यातही स्वयंपाकाच्या कौशल्यबाबत तर नकोच नको !

♦ सुरुवातीच आपली वैयक्तिक माहिती भडाभडा पत्नीसमोर सांगत बसू नये. हळूहळू उलगडाा केल्यासारखे सांगावे.


आपल्या आईस ही प्रसंगी नाही म्हणण्याचे शिकून घ्यावे लागेल. विशेषत: प्रमाणाबाहेर ढवळाढवळ करण्याची सवय असणाऱ्या मातेसमोर आदराने नकार देणे हितकारक आहे. स्वत:च्या भावना आणि कृती यांचे समर्थन करा !

♦ पत्नीसोबत ठरविण्यात आलेला एखादा कार्यक्रम आईसाठी रद्द करण्याचा प्रसंग आलाच, तर त्याची नंतर भरपाई करावी. ती देखील व्याजासह.

♦ आपली पत्नी म्हणजे आपली मोलकरीण नाही. आपल्या पतीकडून मदतीची अपेक्षा तिलादेखील असतेच. तुम्हाला आईच्या स्वयंपाकाची तिने कपडे धुऊन इस्त्री करण्याची सवय असली, तरी तीच अपेक्षा आपल्या पत्नीकडून आपोआप पूर्ण होईलच असे समजू नका.

♦ आपणास जसे वाटते तसेच बोला आणि करा. अशाने आईचा लाडका किंवा पत्नीच्या तालावर नाचणारा , अशी आपली ओळख होणारच नाही. स्त्रीदाक्षिण्य असणारा पुरुष म्हणूनच आपली नवी ओळख होईल. दोघींची एक मजबूत फळी तुमच्या मागे उभी असल्याचे जाणवेल.

# मूल रडतयं तर रडू द्या म्हणून दुर्लक्ष करू नका



झोपलेली लहान मुलं मध्यरात्री उठतात व मोठ मोठ्यानं रडू लागतात. हा अनुभव प्रत्येक जोडप्याच्या आयुष्यात आलेला असतो. मूल मध्यरात्री उठून रडू लागलं की, काही आया त्याला मारतात किंवा उचलून येऊन येरझाऱ्या घालतात. या दोन्ही पध्दती चुकीच्या आहेत.

अशा रडत उठलेल्या मुलाजवळ बसून त्याला थोपटून झोपवावं. उचलून मांडीवर घेऊ नये किंवा खांद्यावर मान घेऊन फिरवू नये. तीच मग मुलांना सवय लागते. मध्यरात्री रडत उठणाऱ्या मुलांच्या पोटात दुखण्याचीच शक्यता जास्त असते. काही जड पदार्थ पोटात गेले की, मुलांचे पोट फुगते. अंगावर पिणाऱ्या बाळाच्या आईने काही अपाचक पदार्थ खाल्ले असतील तरीही बाळाच्या पोटात दुखते. अशावेळी आईने स्वत: ओवा चावून बाळाच्या बेंबीवर फुंकावा व मग बाळाच्या तोंडात फुंकावे, लहान मुलांना चार वर्षापर्यंत मध्यरात्री ओरडत उठायची सवय असते. त्या वयापुढील मुलांना जर आपण असुरक्षित आहोत असे वाटू लागले किंवा एखादे भयावत स्वप्न पडले तरच ती ओरडत उठतात. मुलांच्या चेहऱ्यावर उजेड पडेल अशा प्रकाश योजनेत त्यांना झोपवू नका. मूल झोपले असताना आसपास गोंगाट वा टीव्ही सुरु ठेवू नका. मूल रडतय तर रडू द्या म्हणून कानाडोळा करू नका. त्याच्याकडे ताबडतोब लक्ष दिले नाही, तर मूल जास्तच रडते व गप्प बसायला उशीर लावते. काही मुलं आपल्याकडे लक्ष वेधण्यासाठीही रडत असतात. मुलांच्या रडण्याचा त्याच्या आई-बाबाने तिटकारा करू नये. मुलाला शक्यतो दिवसा भरपूर खेळू द्यावे मग पोटभर पाजून वा जेवायला घालून झोपवावे. लहान मुलांना 'माव्वा आला' 'भूत आलं' असं सांगून भीती घालू नये. मुलं अशा भीतीचं एक काल्पनिक रूप निश्चित करतात व ते रूप कदाचित त्यांच्या स्वप्नात येऊ शकतं.

# पोटाचे विकार कमी होण्यासाठी...



दरवर्षी हजारो लोक पोटाच्या तक्रारी घेऊन डॉक्टरांकडे जातात; तर असे कित्येक लोक आहेत, जे पोटाच्या छोट्या-मोठ्या तक्रारींकडे दुर्लक्ष करतात. यासंबंधात चिकित्सकांचे म्हणणे असे आहे की, अशा व्याधी एकतर स्वत: बऱ्या होतात अथवा छोट्या-मोठ्या इलाजांनीही बऱ्या होतात. तथापी कधी कधी या छोट्या तक्रारी अम्लशूल, अतिगॅस, डायरिया, मलावरोध यासारख्या गंभीर आजारांचेही रुप धारण करु शकतत. म्हणूनच विशेषतज्ज्ञांचे असे सांगणे आहे की, काही गोष्टींचा अवलंब करुन व काही नुकसानकारक गोष्टी टाळून उदर संबंध व्याधींपासून मुक्तता मिळू शकते. आतडी सुरक्षित आणि व्यवस्थित राखण्यासाठी आठवड्यातून कमीत कमी तीन दिवस नियमित रुपात पोटांचे व्यायाम करावेत.


दिवसभराच्या भोजनात संतुलन राखणे जरुरी आहे. अधिक फॅट्सयुक्त आहार घेऊ नये. कारण भोजनात सलग फॅट्सयुक्त पदार्थ घेतल्यास पोटाचे आरोग्य बिघडू शकते. तर मलावरोधापासून बचाव होण्यासाठी दररोज दिवसभरातून कमीत कमी आठ ग्लास पाणी प्यावे. दररोज नियमित वेळेवर शौचास जावे.

# खाण्यावर नियंत्रण ठेवा

सध्याचा आरोग्याचा सर्वात मोठा प्रश्न कोणता? एडस्, मलेरिया, रक्तदाब, मधुमेह की ॲसिडीटी?... यातला कोणताही नाही. लठ्ठपणा हा सर्वात व्यापक आणि तापदायक रोग ठरला आहे. लठ्ठपणाची अनेक कारणे सांगितली जातात पण बैठे काम आणि खाण्यातला अनियमितपणा ही दोन प्रमुख कारणे होत. त्यामुळे खाण्यावर नियंत्रण कसे ठेवावे हा सर्वांपुढील गहन प्रश्न झाला आहे. कोणताही मागचा पुढचा विचार न करता सतत खात राहणे हे काही लोकांचे व्यसनच असते. काही लोक चाळा म्हणून खात राहतात. ते गंमत म्हणून वाटीभर काजू खातील किंवा मूठभर शेंगदाणे संपवतील किंवा पाणीपुरी खातील. काही लोक करमत नसले की काही तरी खातात. आपण नेमके किती खात आहोत याचे त्यांना भान नसते. बघता बघता वजन वाढले की ते चिंता करायला लागतात. अशा लोकांना अशा चरण्याच्या बाबतीत इशारा देणारे एक साधन शास्त्रज्ञांनी विकसित केले आहे. हे साधन शरीराला जोडले की आपण किती आणि काय खात आहोत याचा हिशेब मिळतो आणि आपल्याला जादा खाण्याबाबत सावध केले जाते. या यंत्रात आपण दिवसाभरात किती बकाणे भरले आहेत याची मोजदाद केली जाते. आपली उंची, आताचे वजन, जाडी आणि बॉडी मास याची माहिती या यंत्राला पुरवली की ते आपण किती आणि काय खाल्ले पाहिजे याचा हिशेब करते. म्हणजे हे साधन आपला कोटा नक्की करते. आपल्या कोट्यापेक्षा अधिक काही खायला लागलो की हे मशीन आपल्याला सावध करते. साऊथ कॅरोलिनामधील क्लेम्सन विद्यापीठातल्या काही डोकेबाज लोकांनी हे साधन तयार केले आहे. हे साधन आपल्या मनगटाभोवती बांधलेले असेल. ते आपल्याला सारे काही सांगेल हे खरे आहे पण, त्याला आपली खाद्ययात्रा कशी कळते हा प्रश्नच आपल्याला पडेल. तांत्रिक भाषेत सांगायचे झाले तर हे साधन म्हणजे दुसरे तिसरे काही नसून बाईट काउंटर आहे. म्हणजे आपण काहीही चावले की ते मशीन त्याची नोंद करते आणि त्यावरून आपण किती खाल्ले आहे याचा हिशेब करायला लागते. हे यंत्र आपण जे खातो त्याचे केवळ वजन करून थांबत नाही. त्याला एक सूक्ष्म माहिती पुरवण्यात आलेली आहे. तिच्यानुसार आपण जे काही खात असतो त्यातल्या पदार्थांच्या उष्मांकावरून आपल्या चावण्याची तऱ्हा ठरत असते. त्यावरून आणि अन्य काही निकषांवरून आपल्या आहारातल्या पदार्थांच्या उष्मांकाचीही नोंद या साधनावर होत असते.

त्याबाबतही ते आपल्याला आवश्यक तो इशारा देत असते. शास्त्रज्ञांनी या यंत्राला इटिंग पीडोमीटर असे नाव दिले आहे. लोकांना खाण्याची पथ्ये पाळण्याबाबत कितीही सांगितले तरी त्याचा काही उपयोग होत नाही, कमी खा असे सांगून भागत नाही. आपण काय खात आहोत याची माहिती आणि भानही त्यांना असले पाहिजे पण ते नसते म्हणूनच अशी साधनेउपयुक्त ठरतील असा संशोधकांचा विश्वास आहे.

# शरिरात निर्माण होणाऱ्या गाठींचे दोन प्रकार



फायब्रॉईडची समस्या असलेल्या महिलांना मासिक पाळीच्या वेळी पोटात तीव्र वेदना होतात. काही वेळा वेदनाशामकेही घेऊनही फारसा उपयोग होत नाही. महिन्यातील ते काही दिवस खरोखरच नकोसे वाटतात. पण, या वेदना सहन करण्याशिवाय पर्यायही नसतो. फायब्रॉईडमध्ये तीव्र वेदनांबरोबरच मोठ्या प्रमाणावर रक्तस्राव होतो आणि खूप अशक्तपणाही येतो. फायब्रॉईड्स म्हणजे गर्भाशयाच्या आतील आणि बाहेरील भागातील गाठी. शरीरात निर्माण होणाऱ्या गाठींचे दोन प्रकार असतात. बिनाईन आणि मॅलिग्नंट. मॅलिग्नंट प्रकारातील गाठी कर्करोगाच्या असतात तर बिनाईन प्रकारातील गाठी फारशा धोकादायक नसतात. फायब्रॉईडच्या गाठी बिनाईन असणेही मासिक पाळीच्या दरम्यान फारच वेदनादायक ठरतात. यावर गर्भाशयाची पिशवी काढून टाकणे हाच एक उपाय मानला जातो. पण, आता मुंबईतील जसलोक रुग्णालयात एमआरआय स्कॅनिंगचे फोकस एमआरआय हे नवीन मशिन बसवण्यात आले असून त्याद्वारे शस्त्रक्रिया न करता तसेच वेदनांशिवाय या गाठी नष्ट केल्या जातात. फायब्रॉईडची समस्या असलेल्या महिलांसाठी हे मशिन खरोखरच वरदान ठरू शकेल.

या उपचारपद्धतीत फायब्रॉईडची समस्या असलेल्या महिलेला एमआरआय मशिनमध्ये पालथे झोपण्यास सांगितले जाते. त्या महिलेल्या ओटीपोटाच्या भागाचे एमआरआय स्कॅनिंग केले जाते आणि त्याच वेळी मशिनमधून हाय फ्रिक्वेंसी अल्ट्रासाऊंड किरणे सोडली जातात. ही किरणे फायब्रॉईडच्या गाठींवर आघात करतात आणि या गाठींचा आकार कमी कमी होत जातो. या प्रक्रियेसाठी रुग्णाला भूल देण्याची गरज नसते. तसेच या उपचारांनी त्वचेवर व्रण राहत नाहीत आणि वेदनाही होत नाहीत. लहानपणी आपण भिंग घेऊन त्यातून सूर्याची किरणे कागदावर पाडून कागद जाळण्याचा प्रयत्न केला आहे. फोकस एमआरआय हे मशिनही याच तत्त्वावर चालते. अल्ट्रासाऊंड किरणांमुळे फायब्रॉईडच्या गाठी वितळू लागतात. त्यामुळे त्यांचा आकार लहान होत जातो. अर्थात या उपचारपद्धतीच्या दुष्परिणांबद्दल अजून फारशी माहिती नाही. परंतु, जसलोक रुग्णालयात तेथीलच एका महिला कर्मचाऱ्यावर या पद्धतीने उपचार करण्यात आले आणि त्यानंतर सहा महिने होऊनही तिच्यावर कोणतेही दुष्परिणाम आढळून आलेले नाही. फायब्रॉईडची समस्या सतावणाऱ्या महिलांना शक्यतो गर्भाशयाची पिशवी काढण्याची शस्त्रक्रिया नको असते. अशा महिलांसाठी ही उपचारपद्धती नक्कीच फायदेशीर ठरू शकेल.

●●●

# समाधानी स्त्री घराची लक्ष्मी, घराचे वैभव



आपल्या मुलीने तिच्या सासरी सुखी रहावे अशी प्रत्येक आई-वडिलांची इच्छा असते. त्यामुळेच तिच्यासोबत रुखवतात संसारोपयोगी वस्तू दिल्या जातात. हुंडा, वरदक्षिणा दिली जाते. हे द्यावे न द्यावे आपल्या मर्जीवर अवलंबून असते पण आपल्या मुलीचा संसार सुखी करण्यासाठी खालील अनमोल सल्ला मात्र तिला अवश्य द्या.

व्यवस्थितपणा हा घराचा दागिना, समाधानी स्त्री घराची लक्ष्मी आतिथ्य हेच घराचे वैभव, समाधान हे घराचे सुख असते.

● हे मुली, आजपर्यंत तू आपल्या आई-वडिलांच्या आज्ञेचे पालन केले आहेस. तसे आता तू आपल्या सासू-सासऱ्यांच्या आज्ञेचे पालन कर. नम्रतेने व धीराने वाग.

● लग्नानंतर पतीच आपल्या जीवनाचा जोडीदार असतो. त्याच्याशी नम्रपणे वागणे, त्याच्या आज्ञा पाळणे, हा पत्नीचा श्रेष्ठ गुण व धर्म आहे. पती जर गैर वागत असेल तर रागावू नकोस. धैर्य व मौन राख व तो शांत असताना तो दुखावणार नाही अशा पद्धतीने त्याला समजून सांग. सासरी कोणाचाही मत्सर करु नकोस व वाद घालू नकोस. अन्यथा पतिप्रेमाला पारखे होण्याचा प्रसंग उद्‌भवेल.

● घरकामात आळस करु नकोस व ते हलकेही समजू नकोस. कधीही खोटे बोलू नकोस वा अपमान करु नकोस. शेजाऱ्यांना नावे ठेवू नकोस. सर्वांशी मिळून, मिसळून वाग.

● घराची श्रीमंती दाखविण्यासाठी वा स्वत:साठी इतरांचे पाहून पतीला कर्ज घेण्यास वा त्याच्या ऐपतीबाहेर खर्च करण्यास भाग पाडू नकोस. घर आपल्या उत्पन्नानुसार दक्षतेने व अल्पखर्चात चालव.

● तुझे नशीब तुझ्यासोबत आहे. त्याबाबत ज्योतिषाला विचारु नकोस. बांगड्या वा इतर सौभाग्य चिन्हे घालण्याची इच्छा असेल तर ते आपल्या घरीच मागवून आपल्या सासू-नणंदेकरवी घाल. बाजारात, दुकानात वा परपुरुषाच्या हातून घालू नकोस. कपाळावर नेहमी कुंकू लाव. ते सौभाग्य चिन्ह आहे. दागिन्यांचे व कपड्याचे प्रदर्शन करताना शील हा आपला खरा अलंकार आहे हे लक्षात ठेव.

✲ रोज सकाळी लवकर उठून घर स्वच्छ राख. परक्या घरी जाऊन आपल्या घराचे रडगाणे गाणे ही वाईट सवय आहे. ज्ञानी व सद्‌गुणी स्त्रियांसोबत बसणे हिताचे असते.

● संयमित जीवन शरीर निरोगी राखते व दीर्घायुष्य देते. त्यामुळे शक्ती, आरोग्य व तेज निर्माण होते. यासाठी जीवन अधिकाधिक उज्ज्वल राख.

● तुझे वडील मोठे अधिकारी वा श्रीमंत असतील तरी त्याचा गर्व करु नकोस. पतीसमोर पित्याच्या समृद्धीची प्रशंसा करु नकोस. हा उपदेश अनुसरशील तर जीवनात सुखी राहशील.

# हास्यविनोद...

■ एक माणूस मुलाला घेऊन कटिंगच्या दुकानात गेला. स्वत:चे केस कापून घेतल्यानंतर तो दुकानदाराला म्हणाला, मी आता पंधरा मिनिटांत येतो. याची कटिंग तोपर्यंत पूर्ण करून टाका,

दुकानदाराने मुलाचे केस कापले. दोन तास होऊन गेले तो माणूस परत आला नाही. तेव्हा दुकानदार त्या मुलाला म्हणाले, अरे, बाळ, तुझ्याबरोबरचे गृहस्थ कुठे गेले? तुझे कोण आहेत ते ?

मुलगा म्हणाला, 'मला ते कुठे गेले माहीत नाही आणि ते कोण आहेत ते पण माहीत नाही. मला ते म्हणाले, की चल माझ्याबरोबर तुला फुकटात कटिंग करून देतो. बाकी मला काहीच माहित नाही.

■घड्याळाची किंमत काय ? गिऱ्हाईकाने विचारले, ७५ रुपये, दुकानदाराने उत्तर दिले. इतकी कमी गिल्हाईकाने आश्चर्याने विचारले, यात तुम्हाला फायदा तरी काय होतो ? फायदा विक्रीतून होत नाही, दुकानदार म्हणाला, नंतर घड्याळ्याच्या दुरुस्तीला सगळा फायदा होतो,

■ तुकाराम साहेबाकडे गेला, साहेब, तुकाराम साहेबाला म्हणाला, मला प्रमोशन द्या. मला मॅनेजर बनवा,

मॅनेजर ?

साहेबांना एकदम धक्काच बसला. ते पुढे ओरडून म्हणाले, तुला मॅनेजर बनवू ? वेड लागले आहे काय तुला ?

अच्छा ! तुकाराम शांतपणे म्हणाल, ते आवश्यक असते का ? मला माहीत नव्हते की फक्त वेड लागलेल्या माणसालाच मॅनेजर बनवतात. सॉरी, सॉरी, मग मला तर या जन्मात मॅनेजर बनण्याची संधी मिळणार नाही.

■ बांकेने वडिलांकडे एक लाख रुपयांची मागणी केली. 'काय करणार आहेस तू या एक लाख रुपयांचे ? वडिलांनी बांकेला प्रश्न केला. 'मी ते व्यापारात गुंतवणार आहे ? बांकेने उत्तर दिले. 'आणि त्यात तुला फायदा किती होणार आहे ?' बांकेच्या वडिलांनी पुढचा प्रश्न केला. १५ हजार रुपये तरी होईल, बांकेने विचार करुन उत्तर दिले. वडिलांनी बांकेला पंधरा हजार रुपये देत सांगितले, 'हा तुझा व्यापारातील फायदा समज. तुला पंधरा हजार रुपये फायदा झाला आणि माझे पंच्याऐंशी हजार रुपये वाचेल. दोघेही खुश!

■■■

# आपल्या व्यक्तिमत्वाला एक नवे रुप द्या



आपण जर आपल्या पर्सनॉलिटीची छाप इतरांवर पाडू इच्छित असाल, तर खालील सल्ल्यानुसार आपल्याला व्यक्तीमत्वाला एक नवे रुप द्या.

**सारे काही नशिबावर सोडू नका.**

कोठेही आपल्या व्यक्तीमत्वाची प्रभावी छाप पाडायची असेल, तर त्यासाठी स्वाभिमान व आत्मविश्वास असायलाच हवा. यासाठी जीवनात घडणाऱ्या नकारात्मक व सकारात्मक घटना नशिबाऐवजी जीवनाचा भाग माना. फक्त आपल्या दोषांचा विचार न करता गुणांकडेही लक्ष द्या. त्यामुळे आपले मनोबल उंचावेल.

**अपयशाची कारणे शोधा**

कोणतेही अपयश याला मीच वा माझे कामच जबाबदार आहे इ. म्हणून टाळू नका, त्यामुळे आत्मविश्वास खचेल त्याऐवजी ज्याकारणांमुळे अपयश आले ती जाणून घेण्याचा प्रयत्न करा व त्यातून धडा घेण्याचा प्रयत्न करा, यामुळे आपल्यामध्ये नवी ऊर्जा संचारेल.

**धीर खचू देऊ नका :** जीवनात वादविवादही होणारच; परंत अशा प्रसंगी चुकूनही तोंड पाडून बसू नका. भुवया ताणू नका. दुसऱ्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकून आपला दृष्टीकोन बनवा.

**सर्वांना खुश राखण्याचा प्रयत्न करु नका :** कोणीही एकाचवेळी सर्वांना खुश ठेवू शकत नसते. इतरांच्या आनंदासोबतच आपल्याला स्वत:च्याही खुशीचा विचार करायचा असतो. जेव्हा अशी द्विधा स्थिती उद्‌भवेल तेव्हा स्वत:चाही विचार करा व नंतर निर्णय घ्या. अशावेळी एखाद्याला नकार द्यावा लागला तरी बिचकू नका. एखादा नको असलेला प्रस्ताव पूर्णपणे नाकारा.

**धैर्याने काम करा :** कधीही एक काम अर्धवट टाकून दुसरे काम हातात घेऊ नका. जे काम सोपे वाटेल ते प्रथम संपवा व नंतर दुसरे काम सुरु करा.

लहानपणापासून चांगले संस्कार आणि व्यायामाचे महत्व ओळखले तर व्यक्तीमत्व विकास साधणे कठीण जात नाही. त्याबरोबरच अभ्यासू वृत्ती ठेवली तर शिक्षण क्षेत्रातही चांगले यश मिळविता येते. कुठल्याही क्षेत्रात तुम्ही गेलात तरी हक्काने यश तुम्हाला मिळते. व्यक्तीमत्व विकासाचे महत्व ओळखूनच अनेक संस्थांनी यासाठी प्रशिक्षणाची सोय देखील केली आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी याची अधिक गरज आहे. पर्सनॉलिटीला नवे रुप देता येते.

# महिलांचा लंच ब्रेक आता धुम्रपान झाला आहे

भारत जगात पहिला क्रमांकाचा तंबाखू उत्पादक देश आहे व याच देशात तंबाखूमुळेच १० लाख लोक दरवर्षी मरण पावतात, तरीही केवळ अबकारी करासाठी तंबाखू उत्पादन बंद खरण्यात येत नाही.

असे असले तरी धुम्रपानविरोधी प्रभावी मोहिमेमुळे पुरुषांमधील धूम्रपानाची प्रवृत्ती कमी झाली आहे. पान टपरीवरील सिगारेट विक्री कमी झाली आहे. आता पहिल्याइतके सिगारेटची पाकिटे प्रदर्शित करण्यात येत नाहीत, रस्त्यावरुन जाताना लोक आता सिगारेट ओढत नाहीत, पण पुरुषांची बरोबरी करण्याच्या चढाओढीत तथाकथित सुशिक्षित, नोकरीपेशा महिला सिगारेटच्या आहारी जात असल्याची विचित्र माहिती उघडकीस आली आहे.

पाश्चात्य देशातील महिला लहानपणापासूनच सिगारेट ओढतात; परंतु हे फॅड आता भारसारख्या सुसंस्कृत देशातही पसरत आहे. किटी पार्टीमध्ये तर महिला सर्रास मद्यपान व धूम्रपान करतातच; तर तथाकथित मॉडर्न तरुणी सिगारेटच्या झुरका मारण्यात शान समजतात.

मुंबईच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलच्या डॉ. गौरवी मिश्रा यांसी सांगितले की, त्यांनी ४ कॉलसेंटरचे १२ महिने अध्ययन केले असता, कॉल सेंटरमधील ८ टक्के महिला कर्मचारी टाईमपास म्हणून सिगारेट ओढतात. सिगारेट ओढणाऱ्या महिला २० ते २५ वयोगटातील आहेत. या महिलांचा लंचब्रेक आता धूम्रपान झाला आहे. बीपीओ क्षेत्रात ८० टक्के पुरुष व २० टक्के स्त्रिया धूम्रपान करतात. यामुळे पुरुषांना कॅन्सर होतो, तर महिलांना गर्भपात, टीबी, कॅन्सरसारखे घातक आजार होत असल्याचे डॉ. गौरवी मिश्रा यांनी स्पष्ट के आहे. डॉक्टर फॉर यू या संस्थेचे प्रणेते डॉ. रविकांत सिंग यांनी तर ३५ टक्के महिला धूम्रपानाच्या आहारी गेल्याचे मत व्यक्त केले आहे. तंबाखू चघळणाऱ्या, तंबाखूच्या मिसरीने दात घासणाऱ्या महिलांचा यात समावेश नाही, अशा महिलांची संख्या फारच मोठी असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

# बिझी असलेल्या माणसासोबत संसार कसा करावा? वेळ न देऊ शकल्याने लग्न तुटू नये म्हणून काय करावं? सायकॉलॉजिस्टचा खुलासा



आजच्या धावपळीच्या युगात, जिथे 'हसल कल्चर' (सतत काम करत राहणे) हा यशाचा मंत्र मानला जातो, तिथे नाती मात्र हळूहळू मागे पडत चालली आहेत. सकाळी उठल्यापासून ते रात्री उशिरापर्यंत लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर बसलेले पती-पत्नी, एकमेकांशी संवाद साधण्याऐवजी कामाच्या डेडलाईन्समध्ये हरवून जातात. बाहेरून पाहताना हे जोडपे यशस्वी वाटत असले, तरी घराच्या चार भिंतींच्या आत मात्र शांतता आणि एकटेपणाचा अक्राळविक्राळ पसारा असतो. लग्नानंतरच्या सुरुवातीच्या काळात असणारा तो उत्साह, एकमेकांसाठी काढलेला वेळ आणि छोट्या-छोट्या गप्पा आता 'कॉन्फरन्स कॉल्स' आणि 'मीटिंग्स'च्या गर्दीत हरवल्या आहेत.

जेव्हा एखादा जोडीदार कामात अतिव्यस्त असतो, तेव्हा दुसऱ्याला उपेक्षित वाटू लागते आणि तिथूनच नात्यात दुरावा निर्माण होतो. पण खरंच काम आणि करियरसाठी नात्याचा बळी देणे आवश्यक आहे का? की आपण कामाच्या व्यापातही आपल्या जोडीदाराला प्रायोरिटी देऊ शकतो? बंगळुरू येथील नारायण हेल्थ सिटी येथील प्रसिद्ध क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट श्रेया एस मूर्ती यांच्या मते, यशस्वी वैवाहिक जीवन हे केवळ एकमेकांसोबत किती तास घालवता यावर नाही, तर तुम्ही एकमेकांसाठी भावनिकदृष्ट्या किती उपलब्ध आहात, यावर अवलंबून असते. चला तर मग जाणून घेऊया, या 'बिझी' जगात आपले नाते कसे टिकवायचे आणि फुलवायचे.

**संपर्कापेक्षा विश्वासार्हतेवर भर द्या**

अतिव्यस्त जोडीदारासोबत राहताना अनेकदा घर सांभाळणाऱ्या व्यक्तीला एकटेपणा आणि चिडचिड जाणवते. दिवसभर जोडीदाराची वाट पाहणे आणि तो घरी आल्यावर रागाचा स्फोट होणे, यामुळे नाते अधिक बिघडते. यावर उपाय म्हणजे 'सतत उपलब्ध राहण्यापेक्षा' एक 'निश्चित वेळ' ठरवणे. सकाळी एकत्र चहा पिणे, रात्री झोपण्यापूर्वी किमान १५ मिनिटे मोबाईल बाजूला ठेवून गप्पा मारणे किंवा आठवड्यातून एकदा 'डेट नाईट'चे नियोजन करणे, यालाच 'प्रेडिक्टेबल कनेक्शन' म्हणतात. आपल्या मेंदूला सुरक्षित वाटण्यासाठी जोडीदाराकडून तासनतास वेळ नको असतो, तर 'हा वेळ माझा आहे' ही खात्री आणि विश्वास हवा असतो. यामुळे नात्यातील अनिश्चितता कमी होऊन भावनिक सुरक्षितता निर्माण होते.

**स्पष्ट आणि थेट संवाद साधा**

मराठीत एक म्हण आहे, 'बोलेल त्याचे सुत विकले जाते'. नात्यातही हे तितकेच लागू पडते. अनेकदा आपण जोडीदाराला तुझ्याकडे माझ्यासाठी वेळच नाही किंवा तुला कामापुढे मी दिसतच नाही असे टोमणे मारतो. यामुळे समोरची व्यक्ती बचावात्मक होते आणि वाद वाढतात. त्याऐवजी, आपल्या गरजा स्पष्टपणे सांगा. मला तुझी आठवण येतेय आणि आपण थोडा वेळ एकत्र घालवावा असे वाटते किंवा तुझ्या आयुष्यात माझे महत्त्व काय आहे, हे मला जाणून घ्यायचे आहे, असे शब्द वापरा. जेव्हा तुम्ही तुमच्या भावना थेट आणि हळुवारपणे व्यक्त करता, तेव्हा जोडीदाराला तुमची बाजू समजणे सोपे जाते आणि नात्यात गोडवा टिकून राहतो.

**स्वतःची स्वतंत्र ओळख जपायला शिका**

अनेकदा जोडीदार व्यस्त असताना दुसरा जोडीदार पूर्णपणे त्याच्यावर अवलंबून राहतो, ज्यामुळे नैराश्य येते. मानसशास्त्रज्ञांच्या मते, एका निरोगी नात्यात दोन स्वतंत्र आणि सक्षम व्यक्ती असणे गरजेचे आहे. जोडीदार कामात व्यस्त असताना आपल्या आवडीनिवडी, छंद, मित्र-मैत्रिणी आणि करिअरची ध्येये यांकडे दुर्लक्ष करू नका. जेव्हा तुमच्याकडे स्वतःचे एक स्वतंत्र जग असते, तेव्हा तुम्ही भावनिकदृष्ट्या अधिक कणखर बनता. केवळ जोडीदाराच्या उपलब्धतेवर तुमचे सुख अवलंबून न ठेवता, स्वतःचे आयुष्य समृद्ध करणे हे तुमच्या नात्याला अधिक लवचिक आणि मजबूत बनवते.

**भावनिक उपस्थितीची जाणीव ठेवा**

शरीराने घरात असणे आणि मनाने कामात असणे, हे नात्यासाठी सर्वात घातक आहे. व्यस्त जोडीदाराने हे लक्षात ठेवले पाहिजे की, घरी आल्यावर फोन बाजूला ठेवून जोडीदाराच्या डोळ्यांत बघून बोलणे हे कोणत्याही महागड्या भेटवस्तू पेक्षा मोठे आहे. त्यांच्या दिवसाबद्दल विचारा, त्यांच्या अडचणी ऐकून घ्या. समोरच्याला फक्त सल्ले नको असतात, तर कधीकधी फक्त कोणीतरी ऐकून घेणारे हवे असते. तुमच्या जोडीदाराला हे जाणवू द्या की, जरी तुमचे काम महत्त्वाचे असले, तरी ते तुमच्या आयुष्यात सर्वोच्च स्थानी आहेत. ही छोटीशी भावनिक गुंतवणूक तुमचे नाते दीर्घकाळ टिकवून ठेवते.

**कृतज्ञता आणि आदराची अभिव्यक्ती**

तुम्ही कामात यशस्वी होत असताना, तुमचा जोडीदार घर सांभाळून किंवा तुमच्या अनुपस्थितीत अनेक तडजोडी करून तुम्हाला साथ देत असतो. बिझी असणाऱ्या जोडीदारांनी हे कधीही विसरू नये की, त्यांच्या यशात दुसऱ्याचा मोठा वाटा आहे. जोडीदाराच्या प्रयत्नांचे वारंवार कौतुक करा. तू घर किती छान सांभाळतेस/सांभाळतोस म्हणून मी कामावर लक्ष देऊ शकतो, अशा शब्दांत कृतज्ञता व्यक्त करा. जर कामामुळे एखाद्या कार्यक्रमाला उपस्थित राहता आले नाही, तर प्रामाणिकपणे माफी मागा. तुमच्या जोडीदाराला 'गृहीत' धरणे थांबवून त्यांचा आदर केल्यास, नात्यातील कडवटपणा कमी होतो आणि प्रेमाचा ओलावा वाढतो.

# आता मलाही जमेल स्मार्टफोन !




■ **भाग ५३ :**

**'गुगल लेन्स' (Google Lens) फोटो काढा आणि माहिती मिळवा!**

तुमच्या फोनमध्ये एक अतिशय उपयुक्त ॲप असते, ज्याचे नाव आहे 'Google Lens'. हे ॲप तुमच्या फोनच्या कॅमेऱ्याचा वापर करून जगातील कोणत्याही गोष्टीची माहिती तुम्हाला देऊ शकते.

**१. 'गुगल लेन्स' म्हणजे काय?***

सोप्या भाषेत सांगायचे तर, हे एक असे साधन आहे जे समोरची वस्तू 'पाहून' तिची माहिती सांगते. उदा. तुम्हाला एखाद्या फुलाचे नाव माहित नसेल, तर फक्त त्याचा फोटो काढून हे ॲप तुम्हाला त्या फुलाचे नाव आणि माहिती सांगेल.

**२. 'गुगल लेन्स' चे अजब फायदे**

१. *भाषेचे भाषांतर (Translate) : समजा तुमच्या समोर इंग्रजी भाषेत एखादे पत्र किंवा बोर्ड आहे. तुम्ही गुगल लेन्सने त्याचा फोटो काढला, की ते लगेच त्याचे *मराठीत* भाषांतर करून देते.

**२. अनोळखी वस्तू ओळखणे:** बागेतील एखादे झाड, एखादी जुनी वस्तू किंवा एखादा प्राणी तुम्हाला माहित नसेल, तर त्याचा फोटो काढून तुम्ही माहिती मिळवू शकता.

**३. लिखाण कॉपी करणे (Text Copy) :** एखाद्या पुस्तकातील मजकूर तुम्हाला टाईप करायचा असेल, तर लेन्सच्या मदतीने तुम्ही तो मजकूर निवडून थेट व्हॉट्सपवर कोणालाही पाठवू शकता. टाईप करण्याची मेहनत वाचते!

**४. QR कोड स्कॅन करणे:** औषधाच्या पाकिटावर किंवा कोणत्याही जाहिरातीवर असलेला चौकोनी 'क्यूआर कोड' स्कॅन करून तुम्ही अधिक माहिती मिळवू शकता.

**३. हे ॲप कसे वापरायचे? (पायऱ्या)***

१. तुमच्या फोनमध्ये 'Lens' नावाचे ॲप शोधा (कधीकधी हे गुगलच्या सर्च बारमध्ये कॅमेऱ्याच्या छोट्या चिन्हासारखे दिसते).

२. ॲप उघडल्यावर तुमच्या समोर कॅमेरा सुरू होईल.

३. तुम्हाला ज्या वस्तूची माहिती हवी आहे, त्यावर कॅमेरा धरा.

४. मध्यभागी असलेल्या * पांढऱ्या बटणावर (Shutter button)* क्लिक करा.

५. खाली तुम्हाला त्या वस्तूशी संबंधित सर्व माहिती, व्हिडिओ आणि फोटो दिसू लागतील.

४. भाषांतर कसे करायचे?

लेन्स उघडल्यावर खाली 'Translate' नावाचा पर्याय निवडा.

कॅमेरा इंग्रजी मजकुरावर धरा.

जादू पहा! तुमच्या स्क्रीनवर इंग्रजी शब्दांच्या जागी आपोआप मराठी शब्द दिसू लागतील.

**आजचा गृहपाठ**

१. तुमच्या घरातील एखाद्या इंग्रजी मासिकावर किंवा औषधाच्या डब्यावर *Google Lens* चा कॅमेरा धरून 'Translate' करून पहा.

२. तुमच्या बागेतील एखाद्या फुलाचा फोटो काढून त्याचे नाव शोधण्याचा प्रयत्न करा.

३. तुमच्या फोनमध्ये हे ॲप नसेल, तर 'Play Store' वरून ते डाऊनलोड करा.

**आजची स्मार्ट टिप**

गुगल लेन्सचा वापर करून तुम्ही एखाद्या दुकानातील वस्तूचा फोटो काढून ती ऑनलाईन कुठे आणि किती रुपयांना मिळते, हे देखील शोधू शकता!

■ धनश्री ए. बी.

# नवीन पिढीचे अजब शब्द

**भाग ५: कुणाला तरी 'मारलंय' (Slay) की काय?**




गेल्या काही दिवसांत पांढरे काका बरेच शब्द शिकले होते, पण आज सकाळी त्यांचा चेहरा चांगलाच उतरला होता. बागेत येताच ते कुजबुजले, अगं कल्पिता, आज मात्र खरंच काहीतरी अघोरी घडलंय! सकाळी माझी नात आरशासमोर तयार होऊन उभी होती, तिची मैत्रीण आली आणि जोरात ओरडली- 'Girl, you SLAYED it!' (मुली, तू त्याला मारून टाकलंस!). अगं, कोणाला मारलं हिने? ही कसली मैत्रीण? आणि माझी नात हसून तिला 'थँक्यू' म्हणतेय!

काकांचा घाबरलेला चेहरा पाहून मी त्यांना हसत हसत खुर्चीत बसवलं आणि म्हटलं, काका, शांत व्हा! इथे रक्ताचा एक थेंबही सांडलेला नाहीये, उलट तुमची नात आज जगातली सगळ्यात सुंदर मुलगी दिसतेय असं तिची मैत्रीण म्हणतेय!

**हा शब्द आला कुठून?**

इंग्रजीतील 'Slay' या शब्दाचा मूळ अर्थ जरी 'वध करणे' किंवा 'मारून टाकणे' असा असला, तरी आजच्या 'Gen Z' पिढीसाठी तो कौतुकाचा सर्वोच्च शब्द आहे. जेव्हा एखादी व्यक्ती खूप सुंदर दिसते, एखादं काम अत्यंत चोखपणे पार पाडते किंवा स्टेजवर एखादं सादरीकरण जबरदस्त करते, तेव्हा मुलं म्हणतात- You Slayed!

सोप्या भाषेत, पूर्वी आपण ज्याला 'घायाळ करणे', 'मैफिल गाजवणे' किंवा 'वाखाणण्याजोगे काम' म्हणायचो, त्यालाच आजची मुलं 'Slay' म्हणतात.

**घराघरात होणारा शब्दांचा लोचा:**

समजा, तुमच्या सुनेने आज सणानिमित्त खूप सुंदर पैठणी नेसली असेल आणि तुमची नात म्हणाली, मम्मी, आज तू पूर्णपणे Slay करतेयस!, तर याचा अर्थ असा की आज तिच्या सौंदर्यापुढे बाकी सगळे फिके पडले आहेत.

**आजचा धडा**

आज जेव्हा तुमची मुलगी किंवा नात बाहेर जायला छान तयार होईल, तेव्हा तिला आवर्जून म्हणा- *काय बेटा, आज तर तू पूर्ण 'Slay' (Slay) करतेयस!*

बघा, तुमचं हे बोलणं ऐकून ती आनंदाने उड्याच मारू लागेल आणि तिला वाटेल की तिचे आजोबा खरोखरच 'कूल' झाले आहेत!

पुढच्या भागात आपण एका अशा 'सस' (Sus) बद्दल बोलूया, ज्याचा सासू-सुनेच्या नात्याशी काहीही संबंध नाही!

**लेखक: कल्पिता**



# घरच्या घरी करा सौंदर्योपचार

मसूर डाळ तुपात घोटून तयार केलेला लेप दुधात मिसळून चेहऱ्यावर लावा. असे सात दिवस केल्यास चेहरा सुंदर आणि उजळ होतो.

डाळिंबाची ताजी साल मधाबरोबर वाटा. हा लेप लावल्याने चेहऱ्यावर असलेले वांगाचे डाग दूर होतात.

वायवर्णाची साल बकरीच्या दुधात उगाळून चेहऱ्यावर लेप केल्याने वांग दूर होते.

रक्तचंदन, मंजिष्ठा, लोध्र, कोष्ठकोळिंजन, प्रियंगु, वडाचे अंकुर आणि मसूर यांचा लेप केल्यास वांग नष्ट होते व चेहरा सतेज होतो.

लोध्र वनस्पती, धणे, वेखंड यांचा पाणी किंवा दुधासह चेहऱ्यावर लेप केल्यास तारुण्यपीटिका बऱ्या होतात.

**सर्वसाधारण त्वचेसाठी**

नितळ त्वचेसाठी भरपूर पाणी पिणे अतिशय गरजेचे आहे.

चेहरा गार पाण्याने अनेकवेळा स्वच्छ धुवावा. यामुळे तेलकटपणा कमी होतो.

रोज सकाळी तुळशीचा रस व मध यांचे मिश्रण घेणे फायदेशीर ठरते. त्वचा तजेलदार होते.

ग्लिसरिन, लिंबाचा रस, गुलाबजल घेऊन रात्री चेहऱ्याला लावल्याने चेहरा टवटवीत होतो.

त्वचेचा पोत टिकवून ठेवण्यासाठी ३-४ थेंब लिंबू रस, चिमूटभर शुद्ध हळद, १ चमचा काकडीचा रस एकत्र करून हे मिश्रण चेहऱ्याला लावावे.

काकडीचा, संत्र्याचा रस, पपईचा, सीताफळाचा गर यापैकी एक चेहऱ्याला लावा. त्यामुळे त्वचेचा काळपटपणा कमी होतो. तसेच त्वचा मऊ व्हायलाही हे रस उपयुक्त आहेत.

# उन्हाळ्यासाठी खास मेजवानी: चटपटीत आणि आरोग्यदायी 'काकडीची शेवपुरी'



उन्हाळा वाढला की काहीतरी थंड आणि चटपटीत खाण्याची इच्छा होते. पण बाहेरची चाट किंवा तळलेली पुरी खाल्ल्याने पित्त किंवा पोटाचे विकार होण्याची भीती असते. म्हणूनच आज आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत, पारंपरिक शेवपुरीला एक आरोग्यदायी आणि 'कुलिंग' ट्विस्ट- *काकडीची गिल्ट-फ्री शेवपुरी!

यात मैद्याच्या पुरीऐवजी काकडीच्या चकत्यांचा वापर केल्यामुळे ही रेसिपी हायड्रेटिंग तर आहेच, पण कॅलरीजच्या बाबतीतही अगदी हलकी आहे.

**साहित्य:**

**काकडी :** १ ते २ मोठ्या (जाडसर चकत्या कापलेल्या)

**उकडलेले बटाटे :** २ मध्यम (जैन पर्यायासाठी तुम्ही उकडलेली कच्ची केळी वापरू शकता)

**मसाले :** लाल तिखट, चाट मसाला, मीठ (चवीनुसार)

**चटण्या :** पुदिना-मिरचीची तिखट चटणी आणि चिंच-गुळाची गोड चटणी

गार्निशिंगसाठी : बारीक चिरलेला कांदा, बारीक शेव, ताजी कोथिंबीर आणि लिंबाचा रस.

**कृती :**

**१. बटाट्याचे सारण :** प्रथम एका बाऊलमध्ये उकडलेले बटाटे (किंवा केळी) स्मॅश करून घ्या. त्यात लाल तिखट, चाट मसाला, चवीनुसार मीठ आणि थोडा लिंबाचा रस घालून सर्व व्यवस्थित एकजीव करा. हे तुमचे चटपटीत सारण तयार झाले.

**२. काकडीचा बेस :** काकडी स्वच्छ धुवून घ्या. त्याच्या साधारण अर्धा इंच जाडीच्या गोल चकत्या कापा. लक्षात ठेवा, चकत्या खूप पातळ नसाव्यात, जेणेकरून त्या सारणाचा भार पेलू शकतील.

**३. असेम्बलिंग :** सर्व काकडीच्या चकत्या एका प्लेटमध्ये सजवून ठेवा. प्रत्येक चकतीवर तयार केलेल्या बटाट्याच्या सारणाचा एक छोटा गोळा ठेवा.

**४. चटण्यांची जोड :** आता यावर तुमच्या आवडीनुसार थोडी तिखट आणि थोडी गोड चटणी टाका. वरून थोडा बारीक चिरलेला कांदा आणि चाट मसाला भुरभुरा.

**५. फिनिशिंग टच :** शेवटी भरपूर बारीक शेव आणि चिरलेली कोथिंबीर घालून सजवा.

**या रेसिपीचे फायदे**

**हायड्रेशन :** काकडीत पाण्याचे प्रमाण जास्त असल्याने उन्हाळ्यात शरीर थंड राहण्यास मदत होते.

**कमी कॅलरी :** तळलेल्या पुऱ्या नसल्यामुळे डाएट करणाऱ्यांसाठी हा एक उत्तम पर्याय आहे.

**झटपट तयारी :** पाहुणे अचानक आल्यास किंवा मुलांच्या मधल्या वेळच्या खाण्यासाठी ही रेसिपी ५ मिनिटांत तयार होते.

तर मग, या उन्हाळ्यात आरोग्याशी तडजोड न करता या चटपटीत 'काकडी शेवपुरी'चा नक्की आस्वाद घ्या.

■ धनश्री ए. बी.


**जाहीर नोटीस**

**जिल्हा न्यायाधिश-१ तथा अति. सत्र न्यायाधिश, अकोट यांचे न्यायालयात.**

मो.अ.दा.क.२३/२१

चौकशी तारीख : १८/०४/२०२६

**निलेश गोपालआप्पा कौठकर**
**- विरूध्द -**
**प्रविण वासुदेव खीरोडकर+२**

**बनाम - श्री गजानन टुर्स ॲन्ड ट्रॅव्हल्स प्रोपरायटर सचिन गावत्रे**
**रा.पोस्ट एच.७५, नं.१९८ चारपानी वसाहत राधाक्रिष्ण नगर,बिसरी गाव,भोसरीगाव पुणे जि.पुणे पिन ४११०३९**

ज्याअर्थी उपरिनामीत अर्जदार यांनी या न्यायालयाकडे मोटर अपघात दावा अधिनियम कलम १६६ अंतर्गत रक्कम रू.१,००,०००/- नुकसान भरपाईसाठी अर्ज केला आहे की,

त्याअर्थी, याद्वारे तुम्हाला फर्मांविण्यात येत आहे की, तुम्ही सदर अर्जाविरूध्द कारण दाखविण्याकरीता दिन १८ माहे एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता या न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट कल्पा पाकलामाफत हजर व्हावे, तसे न केल्यास उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.


तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, तुम्ही निर्दिष्ट केलेल्या दिनांकास किंवा त्यापुर्वी बजावणीकरीता पत्ता देण्यास कसूर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही.

**दिनांक २३ माहे फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

दिनांक : २३/०२/२०२६
ठिकाण : अकोट

आदेशानुसार
सही/-
अधिक्षक
जिल्हा न्यायालय,अकोट,


# घरातून निघण्यापूर्वी ही कामे केल्याने होईल यश प्राप्ती



दिवसाची चांगली सुरवात झाली तर दिवस चांगला जातो. दिवसाची चांगली सुरवात होण्यासाठी प्राचीन काळापासून काही परंपरा सांगितलेल्या आहेत. घरातून निघताना ही कामे केल्याने दिवसभर मन प्रसन्न राहते आणि कामात यश प्रप्त होते.

ही पाच कामे सकाळी केल्याने यश मिळते.

**दही खाऊन घराच्या बाहेर पडा**

दह्याचे महत्व प्राचीन काळापासून सांगितले जाते. दही पवित्र आसल्याने त्याचा पूजेत वापर केला जातो. दही खाल्ल्याने मन प्रसन्न राहते. रोज सकाळी घरातून निघण्याआधी दही खाल्ल्याने नकारात्मक कमी होवून , सकारात्मक विचारात वाढ होते. कामात प्रगती होते.

**देवाऱ्यातील देवांचे दर्शन घ्या**

रोज सकाळी घरातून निघण्याआधी देवाऱ्यातील देवांचे दर्शन करावे. याने देवांची कृपा राहते आणि दिवस शुभ जातो.

**तुळशीची पाने खा**

तुळशीचे झाड नाही असे घर शोधून सापडणार नाही. शास्त्रात तुळशीचे महत्व सांगितलेले आहे. ज्या घरात तुळशीचे झाड असते तेथे महालक्ष्मीची कृपा राहते. घरात तुळशीचे झाड असल्यास पैसाचा प्रश्न मिटतो. तुळस एक औषधी वृक्ष आहे. रोज सकाळी तुळशीची पाने खाल्याने कित्येक आजार नाहीसे होतात.

**घराकडे चेहरा करून घराच्या बाहेर पडा**

घरातून बाहेर पडताना घराकडे चेहरा करूनच घराच्या बाहेर पडावे. याने सकारात्मक विचार वाढून यश प्रप्तीच्या संधी वाढतात.

**माता-पिता आणि घरातील मोठ्यांच्या पाया पडा**

घरातून निघताना आई-वडील आणि घरातील जेष्ठांचे आर्शिवाद घेऊनच बाहेर पडावे. ज्या घरात आई- वडील प्रसन्न राहतात, त्याच्यावर देवही प्रसन्न राहतात.

काही लोक आई-वडिल्यांची काळजी घेत नाहीत त्यांना त्रास देतात. अशा घरात सुख कधीच टिकत नाही. घरातून बाहेर निघताना आई-वडीलांचे दर्शन घेऊनच घराच्या बाहेर पडा.

■■■

# स्तुती करा; पण जपून

प्रेमात आणि नात्यात स्तुतीचा चांगला उपयोग होतो. कोणत्याही व्यक्तीला समोरच्याने आपली स्तुती केलेली आवडते. त्यामुळे स्तुती करणाऱ्याबद्दल त्या व्यक्तीच्या मनात एकप्रकारची जवळीक आणि आदर निर्माण होतो. आणि हो कधीकधी जरा जवळीक साधण्यासाठी, थोडं ॲट्रॅक्ट करण्यासाठी स्तुतीचा वापर लोक करतातच.

तुमचा हेतू नि:स्वार्थी असो की स्वार्थी कधीकधी स्तुती आवश्यकतेपेक्षा जास्त होऊन बसते. आणि असं झालं की स्तुती न राहता निंदाच होते. कारण ज्या व्यक्तीची तुम्ही स्तुती करत असता त्या व्यक्तीलाही स्वत:च्या व्यक्तीमत्वाची कल्पना असतेच. त्यामुळे तुम्ही त्या व्यक्तीच्या व्यक्तीमत्वात अजिबात नसलेला गुण दाखवून त्या व्यक्तीची स्तुती करु लागलात तर ती व्यक्ती नक्कीच सावध होते. तसंच रोजच काही कारण नसताना तुम्ही एखाद्या व्यक्तीची विनाकारण स्तुती करु लागलात तरीही त्या व्यक्तीच्या मनात संशय निर्माण होतो.

त्यामुळे ती व्यक्ती जवळ यायच्या ऐवजी दोन पावलं लांबच जाते. म्हणूनच स्तुती करताना एक लक्षात ठेवा की स्तुतीमुळे तात्पुरती जवळीक निर्माण होईल,पण ती फार काळ टिकणार नाही.


**शिरूर नगरपरिषद, घोडनदी**
**पुणे-नगर रोड,ता.शिरूर,जि.पुणे-४१२२१०**
दूरध्वनी क्र.०२१३८-२९९२६२ ई-मेल : shirur.pune@gmail.com
टोल फ्री क्र.१८००-२३३-२१२३ वेबसाईट : shirurnagarparishad.org

जावक क्र.:- १०२३/२०२६, दिनांक :- ०८/०४/२०२६

**निविदा सुचना**

शिरुर नगरपरिषदेच्या कामासाठी खालील निविदा मागविणेत येत आहे. त्यासाठी संबंधीत पुरवठादाराकडून वार्षिक निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | बयाणा रक्कम | निविदा अर्जाची किंमत | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | शिरूर नगरपरिषदेस सिमेंट पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| २ | शिरूर नगरपरिषदेस चेंबर पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ३ | शिरूर नगरपरिषदेस पाईप पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ४ | शिरूर नगरपरिषदेस खडी व डबर पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ५ | शिरूर नगरपरिषदेस मुरूम पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ६ | शिरूर नगरपरिषदेस विटांचा पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ७ | शिरूर नगरपरिषदेस आर. एम. सी. पुरवठा करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ८ | शिरूर नगरपरिषदेस लोखंडी फब्रिकेशनची कामे करणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |
| ९ | शिरूर नगरपरिषद हद्दीतील रस्त्यावर प्लॅस्टिक रबल गतिरोधक बसविणे. | रु.५,०००/- | रु.५००/- | १२ महीने |

**अटि व शर्ती:-**

१. निविदा नमुन्यातील निविदा अर्जाची विक्री शिरुर नगरपरिषद कार्यालयात दि.०९/०४/२०२६ ते दि.२१/०४/२०२६ पर्यंत कामाच्या दिवशी दुपारी १.०० वाजे पर्यंत रोखीने भरणा करुन विकत मिळतील.

२. वरील सर्व माहिती निविदा दि.२१/०४/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत नमूद केलेल्या दिनांकास व वेळेत मा. मुख्याधिकारी, शिरुर नगरपरिषद यांचे नावे सादर करावयाची आहे.

३. प्राप्त झालेली निविदा शक्यतो दि.२२/०४/२०२६ रोजी दुपारी ४.०० वाजता उपस्थित पुरवठादारा समक्ष उघडण्यात येतील.

सही/- (समाधान मुंगसे) नगर अभियंता
सही/- (प्रितम पाटील) मुख्याधिकारी
सही/- (सुनिल जाधव) बांधकाम सभापती
सही/- (मितेश गादिया) उपनगराध्यक्ष
सही/- (ऐश्वर्या पाचर्णे) नगराध्यक्ष शिरुर नगर परिषद, घोडनदी

# विनग्रुपच्या प्रकल्पामुळे आधुनिक, एकात्मिक शहरी विकासाला चालना : मुख्यमंत्री फडणवीस

## व्हिएतनामच्या कंपनीची महाराष्ट्रात ८.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक; उद्योग विभाग व एमएमआरडीए' यांच्यासोबत सामंजस्य करार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : शाश्वत नागरी विकास, औद्योगिक व पर्यटन वृद्धी, नवीकरणीय ऊर्जा क्षमता आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्रात व्हिएतनाममधील विन ग्रुप जॉईंट स्टॉक कंपनी महाराष्ट्रात सुमारे ८.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक करणार आहे. यासंदर्भात विन ग्रुप कंपनीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सोबत सामंजस्य करार केला. विन ग्रुप कंपनीच्या गुंतवणुकीमुळे राज्यात शाश्वत विकास, हरित ऊर्जा, आधुनिक पायाभूत सुविधा आणि गतिशील वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.

वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या या कार्यक्रमात एमएमआरडीएचे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी. अन्बळगन आणि विन ग्रुपचे (आशिया ऑपरेशन्स) मुख्य कार्यकारी अधिकारी फाम सान्ह चाऊ यांनी करारावर स्वाक्षरी केल्या.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्यात सुरू असलेल्या विकासाच्या पार्श्वभूमीवर विन ग्रुपचे महाराष्ट्रात येणे ही आनंददायी आणि सन्मानाची बाब आहे. कंपनी योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी गुंतवणूक करत असून मुंबई व रायगड परिसर हा भविष्यात जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा सर्वात गतिमान शहरी भाग ठरणार आहे. प्रकल्प सुरू झाल्यानंतर सशक्त आणि गतिमान शहरी वातावरण निर्माण होईल.

राज्य शासनाची संपूर्ण यंत्रणा गुंतवणूकदारांना पूर्ण सहकार्य करेल, असे आश्वासन देत कोणतीही अडचण आल्यास संबंधित अधिकाऱ्यांसोबत तसेच थेट संपर्क साधण्याचे आवाहन त्यांनी केले. मागील काही वर्षांच्या अनुभवावरून राज्य प्रशासन कोणतीही समस्या सोडवण्यास सक्षम असल्याचे त्यांनी सांगितले.

या कराराअंतर्गत विन ग्रुपकडून पुढील दोन वर्षांत सुमारे ८.५ अब्ज अमेरिकन डॉलर्सची गुंतवणूक प्रस्तावित असून सुमारे ५ हजार एकर क्षेत्रावर विविध प्रकल्प उभारले जाणार आहेत. या माध्यमातून सुमारे २४ हजार ७०० थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. मुंबई महानगर प्रदेशासह राज्यातील इतर निवडक ठिकाणी हे प्रकल्प साकारले जाणार आहेत. या करारानुसार स्मार्ट निवासी टाऊनशिप, इलेक्ट्रिक मोबिलीटी सोल्यूशन्स, सामाजिक व सार्वजनिक पायाभूत सुविधा, नवीकरणीय ऊर्जा, पर्यटन व मनोरंज या क्षेत्रात विन ग्रुप गुंतवणूक करणार आहे.

या करारानुसार मोठ्या प्रमाणावर स्मार्ट निवासी टाउनशिप उभारण्यावर भर देण्यात येणार आहे. सुमारे २,७०० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाची, पर्यावरणपूरक आणि एकात्मिक टाउनशिप विकसित केली जाणार असून सुमारे दोन लाख लोकसंख्येचा विचार करण्यात आला आहे. त्याचबरोबर राज्यातील इलेक्ट्रिक मोबिलिटीला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर इलेक्ट्रिक टॅक्सी सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव असून मोबिलिटी-एज-अ-सर्व्हिस प्लॅटफॉर्मही विकसित केला जाणार आहे.

सामाजिक आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांमध्ये विनस्कूलच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाच्या शाळा, विनमेकच्या माध्यमातून मल्टीस्पेशालिटी रुग्णालये तसेच व्ही ग्रीन मार्फत राज्यभर इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग नेटवर्क उभारण्यात येणार आहे. यासाठी सुमारे १७० एकर क्षेत्राचा वापर होणार आहे. याशिवाय ५०० मेगावॅट क्षमतेचा सौर ऊर्जा प्रकल्प उभारून स्वच्छ ऊर्जा निर्मितीवर भर दिला जाणार असून त्यासाठी सुमारे १,२०० एकर जमीन आवश्यक राहणार आहे.

## निवडणुका संपल्या आता पक्ष वाढीवर भर द्या

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे राज्यातील संपर्क प्रमुखांना निर्देश

जनप्रवास : प्रतिनिधी



मुंबई : निवडणुका संपल्यात आता पक्ष वाढीचा हंगाम सुरु झालाय. राज्यात शिवसेनेला बळकट करण्यासाठी तळागाळातील शिवसैनिकांपर्यंत पोहोचा, जनतेच्या प्रश्नांवर तत्परतेनं काम करा आणि पक्षवाढीसाठी योगदान देण्याचे निर्देश शिवसेना मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या सर्व आमदार, खासदार, विभागीय संपर्कप्रमुख, सह संपर्कप्रमुख तसेच लोकसभा संपर्कप्रमुखांना दिले. मतदार याद्यांचे बारकाईने पुनरावलोकन करण्यासाठी बूथ प्रतिनिधींची नियुक्ती करा, काम दिसले नाही तर पद राहणार नाही, अशी तंबीच उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना दिली.

नुकताच शिवसेनेकडून संपर्कप्रमुख, विभागीय संपर्कप्रमुख आणि लोकसभा संपर्कप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची महत्त्वपूर्ण ऑनलाईन आढावा व मार्गदर्शन बैठक उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत आज पार पडली. या बैठकीत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी मंत्री, आमदार, खासदार यांना पद विसरुन कार्यकर्ता म्हणून पक्षाचे काम करण्याचे निर्देश दिले. मतदार संघांच्या विभाजनानंतर स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संपर्क प्रमुखांना कामाचा रोडमॅप दिला. लोकसभा संपर्कप्रमुखांनी त्यांच्या क्षेत्रातील प्रत्येक विधानसभेची स्वतंत्र बैठक घेऊन त्या बैठकीचे फोटो आणि तपशील दररोज मला पाठवावा तो मी स्वत: बघणार, असे शिंदे यांनी स्पष्ट केले.

निवडणूक आयोगाकडून राज्यात राबवल्या एसआयआर' मोहीमेसाठी आतापर्यंत कोणी किती बीएलए नेमले, कितीवेळा मतदार संघाचा दौरा केला, किती बैठका घेतल्या? याची विचारणा उपमुख्यमंत्री शिंदे यांनी संपर्कप्रमुखांना केली.


## प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी उपयुक्त ठरणार

### इक्विनिक्स एमबी ३ डेटा सेंटरचे उद्घाटन

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : विविध शासकीय योजनांच्या ऑनलाईन अंमलबजावणीदरम्यान बँडविड्थची कमतरता ही मोठी अडचण ठरत होती. विशेषत: शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केल्यावर अचानक वाढणाऱ्या इंटरनेट ट्रॅफिकमुळे प्रणाली कोलमडण्याची समस्या निर्माण होण्याची शक्यता असायची. अशा परिस्थितीत डेटा सेंटरमधील प्रगत इंटरकनेक्टिव्हिटी आणि तत्काळ बँडविड्थ वाढविण्याची क्षमता शासनासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हस्ते वर्षा निवासस्थानी इक्विनिक्स कंपनीच्या एमबी३ डेटा सेंटरचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी



उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी.अन्बळगन, मुख्य आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे तसेच एपीएसी चे अध्यक्ष सायरस अडग्रा, इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज पॉल, व्ही.पी. ग्रोथ अँड इमर्जिंग मार्केटचे मॅक्स पॅरी, आयबीएक्सचे वरिष्ठ संचालक गणेश पवार, पब्लिक पॉलिसी अँड गव्हर्नन्सच्या संचालक एलिजाबेथ हर्नांडेझ उपस्थित होते. इक्विनिक्स ही जगातील सर्वात मोठी डेटा सेंटर आणि इंटरकनेक्शन सेवा देणारी कंपनी असून, ३६ देशांतील ७७ महानगरांमध्ये २८० डेटा सेंटर्सचे जाळे कंपनीकडे आहे. भारतातील इक्विनिक्सचे पूर्णत: स्वत: च्या मालकीचे आणि नव्याने उभारलेले एमबी३ हे पहिले डेटा सेंटर आहे. या प्रकल्पासाठी सुमारे ३.७ एकर जागेवर उभारणी करण्यात आली आहे.

## अवकाळीने झालेल्या नुकसानीपोटी शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाखांची मदत; जानेवारीपासून झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : राज्यात ऑक्टोंबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाच्या नुकसानीपोटी १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांना १२८ कोटी ६५ लाख रुपयांची मदत देण्यात आल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२५ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसाने राज्यात शेतीचे सुमारे १ लाख १४ हजार ७५२ हेक्टर क्षेत्र बाधित झाले. यामुळे १ लाख ८० हजार ५७४ शेतकऱ्यांच्या शेती आणि शेतीमालाचे नुकसान झाले. या नुकसान भरपाईपोटी शेतकऱ्यांना १२८.८६ कोटी रुपयांची मदत करण्यात आली आहे. हे नुकसान प्रामुख्याने



चंद्रपूर, धुळे, गडचिरोली, जळगाव, नाशिक, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात झाले होते.

जानेवारी ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या अवकाळी पावसामुळे एकूण १,४५,६०६ हेक्टरखालील शेतीचे नुकसान झाले असून २,३३,८९० शेतकऱ्यांना फटका बसला आहे. या पावसामुळे केळी, कांदा, पपई, आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी पिकांचे नुकसान झाले आहे. प्रामुख्याने लातूर, सोलापूर, नाशिक, सातारा, धुळे, नंदूरबार, यवतमाळ, अहिल्यानगर, पुणे, जालना, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या अवकाळी पावसामुळे पाच लोकांचा मृत्यु आणि नऊ लोक जखमी झाले. अवकाळी पावसामुळे ३६ जनावरांचाही मृत्यु झाला आहे.

एप्रिल २०२६ मध्ये झालेल्या पावसानेही १,९४,३२९ शेतकऱ्यांच्या १,२२,९९३ हेक्टर क्षेत्राचे नुकसान झाल्याचे प्राथमिक अंदाजानुसार स्पष्ट झाले आहे. जानेवारीपासून झालेल्या अवकाळी पावसाने नुकसानीच्या पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे.

दरम्यान. जुलै २०२२ पासून जलसंपदा विभागाचे ४१ प्रकल्प पूर्ण झाले असून सुमारे १०५ टीएमसी पाणीसाठा तयार झाला असल्याची माहिती देण्यात आली. या प्रकल्पांमुळे अतिरिक्त २.९५ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

जुलै २०२२ पासून आजपर्यंत २२५ प्रकल्पांना सुधारित तसेच प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या मान्यता ४.३५ लाख कोटी रुपयांच्या असून हे सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर ३३.४५ लाख हेक्टर सिंचन क्षमता तयार होईल, अशी माहिती जलसंपदा विभागाने सादरीकरणाद्वारे दिली.

## कृषी क्षेत्राला नवी दिशा देणारी पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषद : कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषद ही केंद्र आणि राज्यांमधील समन्वय अधिक मजबूत करत शेती क्षेत्रासाठी ठोस दिशा देणारे महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. या माध्यमातून घेतलेले निर्णय थेट महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या प्रगतीस चालना देतील, असे मत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी व्यक्त केले. ते जयपूर येथे आयोजित पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेत बोलत होते.

देशातील कृषी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी आयोजित करण्यात आलेल्या क्षेत्रीय परिषदांच्या मालिकेची सुरुवात जयपूर येथे पश्चिम क्षेत्रीय कृषी परिषदेद्वारे झाली. या परिषदेत महाराष्ट्रासह राजस्थान, मध्य प्रदेश, गुजरात आणि गोवा राज्यांचे कृषी मंत्री आणि प्रतिनिधी सहभागी झाले. महाराष्ट्र शासन व कृषी विभागातर्फे राबविण्यात आलेले महाविस्तार प, अॅग्रीस्टॅक व एआय धोरण यांचे या परिषदेत अनेकांनी कौतुक केले. केंद्र सरकारच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परिषदेत केंद्र-राज्य समन्वय



बळकट करणे, विविध कृषी योजनांचा आढावा घेणे तसेच आगामी खरीप हंगाम २०२६ साठी धोरण निश्चित करणे यावर सखोल चर्चा करण्यात आली.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्राच्या कृषी क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेताना अॅग्रिस्टॅक अंतर्गत १.३२ कोटी शेतकऱ्यांची नोंदणी, आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यात क्षेत्रातील आघाडीचा उल्लेख केला. २०२५-२६ दरम्यान झालेल्या अतिवृष्टी आणि अवकाळी पावसामुळे राज्यातील मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहितीही त्यांनी दिले. सुमारे १३६ लाख शेतकरी आणि १०५ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून राज्य शासनाने २०,१९६ कोटी रुपयांची मदत मंजूर असून यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विशेष आभार त्यानी व्यक्त केले.

यावर्षीच्या सुरुवातीला देखील अवकाळी पावसाचा फटका बसत २९ जिल्ह्यांतील २ लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र बाधित झाले. सध्या प्रशासनाकडून पंचनामे युद्धपातळीवर सुरु असून लवकरच बाधित शेतकऱ्यांना मदत वितरित करण्यात येणार आहे. तसेच केंद्र सरकारकडेही अतिरिक्त मदतीची मागणी करण्यात आली आहे,असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

खरीप २०२६ साठी राज्याने १५८.९२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणीचे उद्दिष्ट निश्चित केले असून बियाणे व खतांचा पुरवठा उपलब्ध करून देण्यात आला आहे. बीबीएफ तंत्रज्ञान, ठिबक सिंचन आणि आधुनिक शेती पद्धतींचा वापर वाढवण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## आदिवासी विद्यार्थ्यांचे यश प्रेरणादायी; आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके

### गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांचा सत्कार

जनप्रवास : प्रतिनिधी

मुंबई : आदिवासी विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या उल्लेखनीय यशातून प्रेरणा घेऊन इतरांनीही शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधावी व समाजाच्या उन्नतीत मोलाचा वाटा उचलावा, असे प्रतिपादन आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक वुईके यांनी केले. शासकीय निवासस्थानी आदिवासी समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार कार्यक्रमात शुभेच्छा देतांना आदिवासी विकास मंत्री डॉ.वुईके बोलत होते.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांनी यावेळी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी विकास विभाग सातत्याने प्रयत्नशील असून या विद्यार्थ्यांनाही परदेशी शिष्यवृत्ती मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल असे डॉ. वुईके यांनी सांगितले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांच्या हस्ते श्रेयस पाटकर यांचा सत्कार करण्यात आला. श्रेयस पाटकर वारली समाजातील विद्यार्थी असून मूळचा उपलाट ता. तलासरी जि.पालघर येथील आहे. त्याचे शिक्षण बी कॉम्प्युटर सायन्स झाले आहे. युके येथील युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिस्टॉल आणि युनिव्हर्सिटी ऑफ सौथम्प्टॉम येथे एम.एस.सी डाटा सायन्स या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता त्यांची निवड झाली आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील सुशांत आत्राम या विद्यार्थ्यांने फर्ग्युसन कॉलेज, पुणे येथून बीएससी कॉम्प्युटर सायन्स मधून शिक्षण घेतले आहे. या विद्यार्थ्यां वेब टूल तयार केले होते त्याचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डिसेंबर मध्ये करण्यात आले होते. आदिवासी विकास मंत्री डॉ. वुईके यांनी, आत्राम याचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कला विश्व

## रणवीर सिंह माझा लकी चार्म आहे, त्याच्यामुळेच मी इंडस्ट्रीत आले, मृणाल ठाकूरने सांगितला किस्सा



मृणाल ठाकूर मनोरंजनविश्वातील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे. ज्यांनी अभिनयाचा कोणताही वारसा नसताना स्वबळावर इंडस्ट्रीत स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली. पण, अशाताच आता मृणालने ती सध्या 'धुरंधर २'मुळे चर्चेत असलेल्या रणवीर सिंहमुळे या इंडस्ट्रीत आहे असं म्हटलं आहे. मृणाल ठाकूर सध्या तिच्या उरलेळीं या आगामी चित्रपटामुळे चर्चेत आहे. १० एप्रिल रोजी चित्रपटगृहात हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. यानिमित्त मृणालने एक मुलाखत दिली आहे. त्यामध्ये तिने रणवीर सिहंबद्दल भाष्य करत त्याच्यामुळे ती या इंडस्ट्रीत असल्याचं म्हटलं आहे. मृणाल रणवीरबद्दल नेमकं काय म्हणाली आणि हा किस्सा नेमका काय आहे याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात रणवीर सिंह सध्या आदित्य धर लिखित व दिग्दर्शित 'धुरंधर २' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. त्याच्या या चित्रपटाने अनेक सुपरहिट चित्रपटांचे बॉक्स ऑफिसवरचे रेकॉर्ड मोडले. तर जगभरातही कोट्यवधींचा गल्ला जमावला. शिवाय चित्रपटातील त्याच्या कामासाठीसुद्धा त्याचं सर्वत्र कौतुक होत आहे. अलीकडेच त्याला 'धुरंधर' या गेल्या वर्षी प्रदर्शित झालेल्या चित्रपटासाठी 'चेतक स्क्रीन अवॉर्ड्स'मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला आहे. अशताच आत मृणालनेसुद्धा त्याचं कौतुक करत एक जुना किस्सा सांगितला आहे. मुलाखतीत तिने याबद्दल सांगितलं आहे. यावेळी तिला आपण रणवीर सिंहबद्दल बोलू शकतो का? असं विचारलं असता ती उत्सुक होत म्हणाली, हो पुढे तिला 'धुरंधर २' पाहिला का असं विचारल्यानंतर ती म्हणाली, 'नाही. मी दुसरा भाग अजून पाहिलेला नाहीये. मी त्याच्यासाठी खूप आनंदी आहे. रणवीर सिंह माझा लकी चार्म आहे. कारण- मी त्याच्यामुळेच आज या इंडस्ट्रीत आहे. मी त्याच्याबरोबर एका जाहिरातीमध्ये काम केलं होतं. एका हेअर ब्रँडसाठी मॉडेल म्हणून मी त्याच्याबरोबर काम केलं आणि जेव्हा ती जाहिरात प्रदर्शित झाली त्यानंतर मला चित्रपटांसाठी विचारणा होऊ लागली. म्हणून मी त्याला याचं श्रेय देते. त्याने मला खूप मदत केली आहे. तो खूप सकारात्मक व्यक्ती आहे. त्याला असंच यश मिळत राहु दे. 'धुरंधर'मधील रणवीरच्या अभिनयाबद्दल मृणाल म्हणाली, मी त्याच्याकडे रणवीर म्हणून पाहिलंच नाही. मी हमझा म्हणूनच पाहिलं. ही खूप कौतुकास्पद गोष्ट आहे की दिग्दर्शक आदित्य धरने प्रत्येक पात्राला न्याय मिळवून दिला.

पेश रावल हे भूत बंगला या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. गेल्या काही दिवसांपासून या सिनेमाची मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. काही दिवसांपूर्वी या सिनेमाचा ट्रेलर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. प्रियदर्शन यांनी या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे. भूत बंगला सिनेमात कॉमेडी तर पाहायला मिळतेच पण काही सीन पाहून भीतीही वाटते. या सिनेमात परेश रावल, राजपाल यादव, मिथिला पालकर, तब्बू, वामिका गब्बी, अक्षय कुमार हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. प्रियदर्शन व अक्षय कुमार हे १६ वर्षांनंतर एकत्र आले आहेत. त्यामुळे ही जोडी पुन्हा एकदा काय कमाल करणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक उत्सुक आहेत. त्यांनी गरम मसाला, भूल भुलैय्या, हेरा फेरी, हंगामा, हंगामा २, भागम भाग अशा चित्रपटांत काम केले आहे. त्यांचे हे सिनेमे प्रचंड गाजले आहेत. तसेच, तब्बू व अक्षय कुमारदेखील २५ वर्षांनंतर पुन्हा एकत्र दिसणार आहेत. परेश रावल यांनी नुकताच पीटीआयशी संवाद साधला. यावेळी चित्रपटाबद्दल त्यांनी भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, या टीमबरोबर पुन्हा काम करताना मजा आली. काही गोष्टींची तुम्ही आतुरतेने वाट पाहत असता, त्यापैकीच हा एक चित्रपट आहे. अशा लोकांबरोबर काम केल्यामुळे हा प्रवास उत्तम होतो. पुढे ते मजेशीरपणे असेही म्हणाले की अशा लोकांच्या सहवासामुळे आरोग्य उत्तम राहतं. ज्या ठिकाणी भूत बंगला सिनेमाचे शूटिंग झाले. त्याच ठिकाणी भुल भुलैय्या या सिनेमाचे २००७ मध्ये शूटिंग झाले होते. त्यामुळे त्याच ठिकाणी शूटिंग करताना खूप आठवणी जाग्या झाल्याचेही परेश रावल यांनी सांगितले. परेश रावल भूत बंगला सिनेमाबद्दल असेही म्हणाले, या चित्रपटात ज्या ठिकाणी भूत राहते, तिथे लग्न होते. त्यामुळे काय घडू शकते, याची तुम्ही कल्पना करू शकता. तुम्ही असा सुंदर हॉरर चित्रपट अजून पाहिला नसेल. दिग्दर्शक प्रियदर्शन यांच्याबद्दल परेश रावल म्हणाले, त्याच्यासारखे दिग्दर्शक मी कमी पाहिले आहेत. जर त्याने सांगितलं की शूटिंग १० दिवसांत होणार आहे. तर ९ दिवसांत शूटिंग पूर्ण होते. तो अशा दिग्दर्शकापैकी एक आहे, ज्याला त्याच्या कामाची स्पष्टता आहे. अशा व्यक्तीपासून खूप वर्षे दूर राहणे चांगली गोष्ट नाही. जेव्हा मी सेटवर आलो, तेव्हा खूप मजा केली. हेरा फेरी ३ या सिनेमाची घोषणा झाल्यानंतर परेश रावल यांनी चित्रपटात काम करणार नसल्याचे सांगितले होते. त्यानंतर अक्षय कुमार व त्यांच्यात वाद झाला होता. अक्षय कुमारने त्यांना कायदेशीर नोटीस पाठवली होती. काही दिवसानंतर परेश रावल यांनी हेरा फेरी ३ मध्ये काम करणार असल्याचे सांगितले होते.

## अक्षय कुमारबरोबरच्या मैत्रीबद्दल परेश रावल यांचे स्पष्ट मत



✻ मुख्य संपादक – संजय प्रल्हाद भोकरे ✻ संपादक –सिद्धार्थ संजय भोकरे ✻ सरव्यवस्थापक – सुरेखा खानोरे हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय प्रल्हाद भोकरे यांनी दैनिक जनप्रवास, सर्व्हे नंबर ३११/१/अ/२ कासार अंबोली, तालुका मुळशी, जि.पुणे येथे छापून चिनार हाईटस्, ४ था मजला, प्रभात रोड, गल्ली नं.५, पुणे-४११ ००४ येथे प्रकाशित केले. येथे प्रकाशित केले. RNI NO. MAHMAR/2013/57952. मो. ८६०५६४१११३. पुणे कार्यालय : फोन – ०२०-२५४२४२३२ E-mail : dainikjanpravas@gmail.com